असल्याने जो तो अन्नदात्याला दुवा देत होता. अन्नदात्या प्रभूची ही विविध रूपे संतुष्ट झाल्याचे पाहून तो गृहस्थ तृप्त झाला. दीडदोन हजार मजूर आपल्या या दात्याला राजासारखे मानीत असताना पाहून औंधचा राजा चकित झाला.

या भागात आपण राजे ! रयतेची देखभाल आपण करायची. या लहानशा गोंदवले गावात हा आणखी कोण एक राजा ? औंधच्या राजाने जिज्ञासेने चौकशी केली. गोंदवल्याच्या वतनदार कुळकर्ण्यांनि आपल्या शेतातच जणू अन्नछत्र सुरू केल्याचे त्याला समजले. आजुबाजूच्या खेड्यातील लोकही गोंदवल्यास कामासाठी आले. गावातील लोकांच्या मदतीने कुळकर्ण्यांनी या सर्वांना दुष्काळात काम पुरविले. लोकांची हीनदीन स्थिती पाहून त्याचे डोळे करुणेने भरून येत. "रामराया ! काय रे ही अवस्था या गरिबांची !" देवाला वा दैवाला दोष देणारा हा कुळकर्णी नव्हता. आधुनिक काळातील या दामाजीने आपले धान्याचे कोठार खुले केले. रामरायाची उपासना गोरगरिबांना अन्नदान करून त्याने व त्याच्या पत्नीने वाढविली. हे अलौकिक धर्मकृत्य पाहून औंधचा राजा चकित झाला. त्याने गोंदवल्याच्या कुळकर्ण्यांची भेट घेतली. हा कुळकर्णी थोर सत्पुरुष आहे, साक्षात्कारी संत आहे, गरिबांचा कनवाळू आहे, अशी खात्री पटून औंधचा राजा त्याच्या पायाशी नमला. हा कुळकर्णीच खरा राजा, आपण केवळ नामधारी, अशी राजाची खात्री झाली.

दुष्काळात गोरगरिबांना कामास लावून, रामप्रभूच्या नामात गुंतवून त्यांच्या शरीराचे व मनाचे पोषण करणारा गोंदवल्याचा हा कुळकर्णी म्हणजे अर्वाचीन काळातील एक थोर सत्पुरुष ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज होत. महाराज गृहस्थाश्रमी असले तरी अधिकाराने फार थोर होते. रामनामासारखे सोपे व खात्रीचे साधन त्यांनी लोकांपुढे उभे केले. या नव्या काळात संसारी माणसास यज्ञयाग, व्रतवैकल्ये, नवससायास, जपतपादि जमण्यासारखे नव्हते. नित्याचा उद्योग नेकीने व सचोटीने करून रामप्रभूच्या चिंतनात रंगून जाण्यात सर्वकाही असल्याचा संतप्रणीत बोधाचा एक नवा साक्षात्कार श्री गोंदवलेकर महाराजांना झाला होता. त्यांच्या या साक्षात्कारास करुणेने भरलेली एक सामाजिक आशयाची किनार होती. श्री रामप्रभूच चैतन्यतत्त्वाने या चराचर सृष्टीतून व्यक्त झाला असल्याची अनुभूती त्यांना होती. "**जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत॥**" हा संतबोध वृत्तीत मुरला होता. "**जे का रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले**" त्याच्या ठिकाणी देवत्वाचा वास असतो किंवा तोच देव असतो, याची प्रचीती श्री महाराजांकडे पाहून सर्वांना येई. महाराजांच्या घराण्यातच हा देवत्वाचा धागा परंपरेने परिपुष्ट झालेला दिसतो. महाराजांना लहानपणी 'गणुबुवा' म्हणून ओळखत. एकदा त्यांच्या आजोबांनी पाच वर्षांच्या आपल्या नातवास विचारले,

"बाळ गणू, तुला हंडाभर रुपये दिले, तर काय करशील ?"

"मी ते रुपये वाटून टाकीन. आंधळ्या-पांगळ्यांना, गोरगरिबांना मी ते रुपये देऊन टाकीन."

"आणि तुला कुणी राजा केले तर ?"

"तर, राज्यात कुणी गरीब उरणार नाही असे करीन. गरीब राहिले, तर मी त्यांच्यासाठी अन्नछत्र उभे करीन."

लहानग्या गणूच्या कोवळ्या वृत्तीत असे दैवी रोपटे वाढत होते. पंढरीचा विठ्ठल, अयोध्येचा राम, सर्वत्र संचार करणारा दत्तात्रेय एकरूपाने गोंदवल्याच्या परिसरात वावरत होता. या प्रभूची कृपा महाराजांच्या रूपाने चालतीबोलती बनली होती. आत्मज्ञानाचे हे इवलेसे रोप वाढता वाढता त्याचा गगनाएवढा वृक्ष डवरून आला. त्याच्या छायेत असंख्य जीवांना विसावा मिळाला. सांसारिक वा व्यावसायिक तापाने पोळणाऱ्या जीवांना गारवा प्राप्त झाला. नाना प्रकारच्या संकटांच्या वर्षावामुळे गारठून मृतवत् झालेल्या जीवांना प्रभुप्रेमाची ऊब मिळाली आणि त्यांना या नीरस व रुक्ष जीवनात जगण्यासारखे पुष्कळ आहे, अशी मनोमन खात्री पटली.

## पवित्र ते कुळ

श्री गोंदवलेकर महाराजांचा जन्म सन १८४५ साली (माघ शु. १२, शके १७६६) झाला. त्यांचे मूळ घराणे

*(पृष्ठ क्र. ३३ वर)*

जन्मोत्सवानिमित्त (१० जानेवारी)

# स्वामी स्वरूपानंदांचे अमृत बोल

- भालचंद्र गन्द्रे

**श्री** स्वामी स्वरूपानंदांमुळे रत्नागिरीतील 'पावस' या स्थानाला आज आगळे महत्त्व प्राप्त झाले असून ते तीर्थस्थान बनले आहे. स्वामी स्वरूपानंद यांनी पावसला ठाण मांडून, ''सोऽहं'' साधनेचा पाठपुरावा केला. नाम-साधना वाढविण्याचे अवतारकार्य अखंडपणे करून ते पावसलाच समाधीस्थ झाले. त्यांचे समाधीस्थान अत्यंत प्रसन्न, शांत, भव्य-दिव्य असून तेथील जिवा-शिवाची गाठ पडणारा निवांत एकांत ही या समाधीस्थानाची भक्तांना मिळणारी अमोल देणगी आहे. स्वामी प्रकृती अस्वास्थ्यामुळे जास्त बोलत नसत. मोजके, पण नेमके बोलून ते भक्तांच्या नाना प्रश्नांना समर्पक उत्तरे देत. दौरे, वादविवाद, सभा, भाषण यांत त्यांनी भाग घेतला नाही. भक्तांशी थोडेफार बोलल्यावर ते पुन्हा श्री. देसाई यांच्या घरातील आपल्या खोलीत जाऊन निजत व अखंड ''सोऽहं'' साधनेत रत असत. आपल्या नाजुक प्रकृतीचा साधना बळकट करायला त्यांना जणू आधारच मिळाला. त्यांच्या हाताचे तळवे - पाय कापसासारखे मऊ होते. त्याचप्रमाणे त्यांचा स्वभावही नम्र, मृदू, निगर्वी, शांत होता. त्यांच्या नुसत्या दृष्टीक्षेपाने वा स्पर्शाने समोरच्या माणसास दिव्य ज्ञान प्राप्त होई. मोजक्या शब्दांत ते सारा भाव स्पष्ट करून आनंद देत असत. दूरवर असणाऱ्या आपल्या भक्तांना त्यांनी छोटीशीच, पण अनेक पत्रे लिहिली. त्यांची ही पत्रे कलियुगात गुरुपादिष्ट मार्गासाठी धडपडणाऱ्या मुमुक्षूंना विचारप्रवर्तक, उद्‌बोधक व अमृतानुभव देणारी आहेत. तरी, त्यानुसार आचरण करून स्वतःच मार्गस्थ होण्यासाठी त्यांतील काही निवडक पत्रे व संभाषणे पाहू या.



### स्वामी अमलानंदांना केलेला उपदेश

### साधनेचा वृथा अहंकार नसावा :-

अभ्यास हा ज्याचा त्यानेच करावयाचा असतो. दुर्धर, बिकट प्रसंगी मार्ग दाखविता येईल; पण योग्यता प्राप्त झाली नसताना उगाच घाई करून चालत नाही. एका बिंदूने जर अमरत्व लाभत असेल, तर अमृताच्या कुंभात बुडवल्यामुळे आणखी काही विशेष लाभ होण्याचा भ्रम कशाला ! निदिध्यास, गुरुनिष्ठा, सतत ''सोऽहं'' अनुसंधानात्मक भजन करावे. मग, जसजशी प्रगती होईल तसतशी खूण पटू लागेल. गुरुरूपच होऊन भजन करावे (''सोऽहं'' साधना करावी). म्हणजे कोणतेही न्यून राहणार नाही. साधनेबद्दल वृथा अहंकार नसावा.

### मी कोण, याचा वेध घ्या !

ध्येय गाठण्याचे कार्य म्हणजे, ''मी कोण'', हे समजून घेणे व 'मी'चा शोध करून, त्यास हस्तगत करणे होय ! ''मी कोण'', हे शोधण्यासाठी तळमळ, दृढ निश्चय, चिकाटी यांसह मार्ग आक्रमण करणे, गुरुवर अढळ श्रद्धा ठेवणे वगैरे ध्येयपूर्तीच्या पायऱ्या आहेत. ''मी कोण'', याचा शोध लावून, स्वानंद-साम्राज्याचा उपभोग घेण्याची तळमळ लागणाऱ्या प्राण्यास 'मुमुक्षू' व ''मी कोण'', याचा शोध लावून स्वानंद-साम्राज्याच्या उपभोगाच्या आनंदात रममाण होऊन मुरून जाणे, यास 'मोक्षप्राप्ती' व आत्यंतिक आनंदाच्या, स्थितीला 'मोक्ष' असे म्हणतात.

''मी कोण'', याचा शोध लावण्यास पुढील गोष्टींची जरूर आहे. प्रथम, 'गुरुकृपा' संपादन करणे. मग, आपल्या मनात कसल्याही संकल्पविकल्पास थारा न देता, गुरुवचनावर अढळ व पूर्ण श्रद्धा ठेवून, अनन्य भक्तीने गुरुसेवा करून, आपल्या आचरणाने गुरुच्या अंतःकरणात आपल्याबद्दल प्रेमाचा ओलावा निर्माण करून, त्यांच्या कृपेस आपण पात्र असल्याचे सिद्ध करणे.

### ''सोऽहं'' साधना :-

गुरुचा अनुग्रह झाल्यावर, म्हणजे गुरुने मंत्रोपदेश दिल्यावर, त्या मंत्राचा जप करावा. हा मंत्र म्हणजे, ''मी कोण'', याचे उत्तर ''सोऽहं'' हे होय ! ''सोऽहं'' याचा अर्थ ''तो मीच आहे'', म्हणजे ''परमेश्वर तो मीच आहे'', असा आहे. या मंत्राचा अर्थ ध्यानात घेऊन श्रद्धेने जप चालू ठेवला पाहिजे. संसारातील कोणत्याही व्यवहाराआड हा जप येणार नाही. ''सोऽहं''चे अर्थयुक्त अखंड अनुसंधान ठेवल्यामुळे विश्वाकडे साधकाला अलिप्तपणे पाहता येऊ लागते. अगदी देहपतनाच्या वेळीही, कसलेही भय न बाळगता, एकत्वात विलीन होता येते. वारा नसलेल्या ठिकाणचा दिवा जसा शांत तेवत असतो त्याप्रमाणे अखंड ''सोऽहं'' अनुसंधानाने स्वस्वरूपाच्या ठायी बुद्धी अगदी स्थिर होऊन जाते. ''सोऽहं'' अनुसंधानाने बुद्धी अगदी स्थिर होऊन वृत्तीही अगदी शांत ठेवणे शक्य होते. सर्वच कर्मांत, व्यवहारात एक प्रकारची अलिप्तता आपोआपच येते.

### आपला अनुभव आपणच घ्यावा :-

काही पंडित लोक नसती काथ्याकूट करून आपापल्यापरी काहीही शोध-बोध लावोत; आपण आपला अनुभव घट्ट करून अद्वैतरूप आनंदरसात डुबावे. अनुभवाशिवाय उगाच नसती बडबड करू नये. कोणताही संप्रदाय एकच सद्वस्तू दाखविणार. मग, आपला ''सोऽहं'' भाव काय वाईट !

**''वस्तू शोधू जाता, वस्तूची झाला**
**मग काय पाहिजे हो त्याला ॥''**

स्वतः अनुभव घ्यावा. अनुभवी लोक पाठिशी असले की, चुकायला होत नाही व निर्णय कायम राहून अचूक ठिकाणी जाता येते; जाण्याचा प्रयत्न मात्र साधकाने सांगितलेल्या मार्गाने केला पाहिजे. मी तसा केला, तुम्हीही तसाच करा !

### भावातीत गुरुसेवा हवी :-

मी पादस्पर्श, हार घालून घेणे, पादसंवाहन करणे, पाद्यपूजा, तीर्थ देणे वगैरे गोष्टी नको म्हणतो. कारण, अंतरीच्या शुद्ध भावाने हे सर्व लाभतेच. गुरुसेवा याचा अर्थ केवळ शारीरिक सेवा असाच नव्हे. काल तुम्ही माझ्या खडावा घेऊन पुढे आलात, असे नको. शिष्याचा भाव असावा; पण गुरुने शिष्यांची सेवाही विशेष कारण नसताना घेऊ नये. या सर्व भावनाच असतात. आपणाला भावातीत व्हायचे आहे. निर्गुण, निराकार उपासनेत हे कुठे बसते, सांगा पाहू ? माळ, जप, मृगाजीन, आसन ही साधकास साधकावस्थेत स्थिर करण्याची फक्त साधने; परतत्त्वावर अलक्ष लक्ष अखंड ठेवणे, हे मुख्य; बाह्य गोष्टी गौणच !

### वृथा चिंता करून आत्मरूप विसरू नये :-

सतत ''सोऽहं'' अनुसंधानात असता साक्षीवृत्तीने सतत आनंद भोगता येऊ लागतो, संसाराचे आघात सुलभतेने सहन होऊ लागतात. देवभक्त ऐक्यानंदातच राहतात. उगाच नसत्या चिंता करून आत्मरूपाचा विसर पडू देऊ नये. मनाची उद्विग्नता वाढवू नये. देवावर भार टाकून निष्काळजी रहावे. भक्त हा ईश्वरापासून वेगळा राहतच नाही. ज्याच्या ठायी ''सोऽहं'' भाव अखंडित आहे अशा भक्ताचा तो ''सोऽहं'' भावही शेवटी ईश्वराच्या ठायी तदाकार होऊन ''सोऽहं'' वृत्तीही मावळते व तो आत्मरूपच होतो, ज्ञाता, ज्ञान सर्व एकरूपच होते. हीच एकनिष्ठ भक्ती !

### साधकावस्थेत गुरुसान्निध्याची गरज :-

ध्यानातून उठल्यावरही सर्व व्यवहार करतानादेखील ''सोऽहं''चे अनुसंधान राखण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे बाह्य जगाचे आघात मनावर कमी होतील. साधकाने वर्षातून एखाद महिना जरी गुरुसान्निध्यात सेवा, भजन, साधना केली तरी अकरा महिने साचलेली घाण, मळ धुवून जावून स्वस्वरूपी राहण्यास मदत होते. गुरुसान्निध्य साधकावस्थेत काही काळ हवेच.

**गुरुनिष्ठा व नित्यनियमाने स्वानंदप्राप्ती :-**

गुरुनिष्ठा ही कोणत्याही संप्रदायात अत्यंत महत्त्वाची मानलेली आहे. थोर संत कबीर यांनी म्हटल्याप्रमाणे, हा देहरूपी वस्त्राचा शेला सद्‌गुरुला सर्वभावे अर्पण करावा. ''सोऽहं''रूपी उभ्या व आडव्या धाग्यांनी हे वस्त्र विणले जाते. जर काही कारणाने विक्षेप येऊन भजनात खंड पडला तर, या वस्त्राचे धागे तुटतात. ते परत साधून घेऊन, रोज नित्यनियमाने वस्त्र विणून, जीवनयात्रेचे महावस्त्र गुरुस सर्वभावे अर्पण करावे. अहंकार समूळ नाहीसा झाल्यावर गुरुच शिष्य बनून हे वस्त्र विणून दाखवितो, त्याचा तोच खेळतो, हा अनुभव येऊ लागतो. त्या आनंदाची अवीट गोडी अनुभवीत जीव संसार मोक्षमय झाल्याचे पाहतो. सर्वच हरिरूप दिसू लागून स्वानंदाचा उपभोग घेत जीव लीलया रमत असतो. हाच ''सोऽहं'' मार्ग! तुम्ही अभ्यास, भजन अथवा नित्यनेम, काहीही म्हणा; पण ते शेवटपर्यंत करीत राहिले पाहिजे. दररोज केव्हाही, कुठेही अल्प तरी साधना आवश्यक. दररोज कुठेही असताना, कशाही परिस्थितीत असताना, थोडा वेळ का होईना, ''सोऽहं'' ध्यान प्रसन्नचित्ते, भक्तिभावाने करून मग सांसारिक जीवनास सुरुवात करावी. ''सोऽहं'' चिंतनाने मनास स्वैर भटकण्यास वावच रहात नाही. ''सोऽहं'' साक्षित्वाने सुख-दुःखाचे हेलकावे सहन होऊन आपण संपूर्ण अलिप्त असून देहप्रारब्धानुसार वर्तत आहोत, असा खेळ लीलया पाहता येतो.

**अलिप्तपणे आसक्तीरहित संसार करा !**

मुलाबाळांनी ऐकल्यास, योग्य तो सल्ला द्यावा. संसारात कोणत्याही बाबतीत अट्टाहास न ठेवता अलिप्तपणे संसार करावा. देहधर्म आहे तोपर्यंत काळ-वेळ, परिस्थितीनुसार वागूनही शांती ढळू देऊ नये, मूळ भजनात सतत रहावे, म्हणजे सर्व गोष्टी साधतात.

**गुरुवर श्रद्धा ठेवून**
**मायेत न रमता सतत प्रयत्न करा !**

सर्व गोष्टी काय, घटना काय अथवा वेळा काय, नेहमी त्याच तऱ्हेच्या राहत नाहीत. शनिवारवाडा बांधण्याच्या सोहळ्याचे चित्र पाहणाऱ्यांसमोर त्याची आजची स्थिती वर्तविली असती, तर त्यावेळी फारच विपरीत वाटली असती. सिद्ध होऊ इच्छिणाऱ्याने नित्यानित्य विवेकाने, सर्व व्यवहार, मायेचे खेळ लीलेने जाणून, आपण अज, अव्यय, अरूप कसे आहोत, हे ओळखून सर्व गोष्टी तटस्थपणे पहावयास शिकले पाहिजे. अशा विचाराने मनाला मोठी वाटणारी गोष्ट या विश्वाच्या पसाऱ्यात क्षुल्लक व क्षणभंगूर दिसेल. तुमच्या कार्यालयातील कसली केस ! त्याची कसली चिंता ! काय भय ! जे जे होते तो त्याचाच खेळ. जीवास बोध देण्यासाठी ते घडते, असे समजावे. सर्व गोष्टींतील व्यावहारिक व पारमार्थिक अर्थ जाणून मी कोण, मी कसे वागावयाचे, मला कसले बंधन, कसली मुक्ती, कल्पनांचा पसारा मांडून कोडी उलगडण्याचे प्रयत्न तरी कशाला करावयाचे; एकच ध्येय, सद्‌गुरुंनी सांगितलेल्या महावाक्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून सतत मार्ग आक्रमित आनंदधाम गाठावे. प्रयत्न सातत्याने असावा व त्यामुळेच कार्यभाग होईल, अशी पूर्ण खात्री बाळगा !

**रोज पहाटे अनुसंधान साधावे :-**

तुम्ही पहाटे एक-दोन तास ''सोऽहं'' भजन करा ! मनाच्या वृत्ती कशा उठतात, कशा मावळतात, कुठून उद्‌भवतात, ते ''सोऽहं'' अनुसंधान करीत असता पहा ! त्याचा उगम, लय यांचे साक्षित्व करीत करीत पुन्हा साक्षी ते स्फुरण, आपणावाचून दुसरे कोण - तेच आपण, तेथेच स्थिर व्हावयाचे, असा ज्ञानदृष्टीने अभ्यास करता करता सर्वच गोष्टींचा उमज पडेल.

**श्रद्धायुक्त प्रार्थनेने संकटनिरसन :-**

देवाच्या अनन्य प्रार्थनेवाचून दुसरा काय उपाय असणार ! साधक मात्र एकनिष्ठ असावा. उडी टाक म्हटले की, त्याने उडी टाकली पाहिजे. असे असेल, तर देवसुद्धा त्यास झेलण्यास तयार असतो. अनन्य भावाने भक्ती करावी, म्हणजे देव रक्षण करतो. काळज्या, संकटे सर्व त्याच्याच कृपेने दूर होतात.

**सर्व क्रिया वासुदेवमय करा !**

याज्ञवल्क्य, जनक, एकनाथ वगैरेंनी राज्य, संसार

करूनही समत्वाने, अकर्तेपणाने, अहंकारविरहित सर्व गोष्टी केल्या. ते लोक खरेखुरे त्यागी - संन्यासी, करून अकर्ते होते. मूळ गोष्ट, ईश्वराबद्दल दृढभाव, सर्वार्पण शुद्ध व स्थिर बुद्धी झाली की, संकल्प-विकल्पात्मक वृत्ती उठतच नाहीत. अशामुळे सर्वच क्रिया-कर्मे वासुदेवमयच होतात. अशा भक्तांवर संकटे, दुःखे वगैरे आघात आले, तर त्याची काळजी नारायणालाच लागते. तोच त्या भक्ताच्या पाठिशी राहून त्याचे संरक्षण करतो. ही गोष्ट त्रिकाल सत्य समजा !

**सद्गुरुशक्ती पाठिशी असतात :-**

आदिनाथ, मत्स्येंद्र इत्यादी गुरुपरंपरेतील सर्व महान शक्ती साधकाच्या पाठिशी अहर्निशी वास करीत असतात. ''सोऽहं'' साधनेत काही न्यून रहात असले, तर सद्गुरुच सर्व पूर्ण करतो व हळूहळू साधकास पुढे नेतो. आत्मबोधाच्या वारंवार अनुसंधानात्मक अभ्यासामुळे, प्रयाणकाळीही सद्गुरु स्वस्वरूपाची आठवण देऊन त्यावेळीही काही अडचण निर्माण होऊ देत नाही.

❑❑❑

---

*(पृष्ठ क्र. ११ वरून)*

माणदेशातील दहिवडीजवळील वावरहिरे या गावचे. त्यांचा मूळ पुरुष रुद्रोपंत व त्यांचे आडनाव घुगरदरे. घुगरदरे हे वसिष्ठ गोत्री शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण असून रुद्रोपंत पंढरीच्या विठ्ठलाचे एकनिष्ठ उपासक होते. या भागवतसंप्रदायी घराण्यात पंढरीची वारी होती. महाराजांचे पणजोबा कुलकर्णीपण करण्यासाठी गोंदवल्यास येऊन स्थायिक झाले, तरी पंढरीची वारी घराण्यात कायम होती. महाराजांचे आजोबा लिंगोपंत हे मोठे भगवद्भक्त असून त्यांचा संसारही मोठा आदर्श असा होता. प्रामाणिक वृत्ती, परोपकारी स्वभाव व ईश्वरावरील निष्ठा या गुणांमुळे लिंगोपंतांचे वजन सरकारदरबारी मोठेच असे. साऱ्या माण तालुक्यात त्यांच्या नावाचा प्रभाव पडे. सरकारकडून त्यांच्या कार्याबद्दल त्यांना काही जमिनी मिळाल्या व कुलकर्णी घुगरदरे इनामदार बनले. त्यांचा जीवनक्रम पहाटे नित्य प्रभुस्मरणाने होई. स्नानसंध्या, पूजाअर्चा, पठण, पुराणश्रवण इत्यादी धार्मिक कामांत त्यांचा वेळ जाई, तरी सरकारी कामे ते तितक्याच तडफेने उरकीत. काटेकोर न्याय; पण माणुसकीची जाण, असे त्यांच्या कार्याचे स्वरूप राही. हरिपाठ झाल्यावर रात्री गावकऱ्यांच्या सहवासात सुरेल भजन होई. भजनामध्ये ते रंगून जात. विठ्ठलाच्या नामस्मरणाने त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू पाझरत. ते पंढरीची वारी नेमाने करीत. त्यांच्या गळ्यात तुळशीची माळ असे. वारकऱ्याप्रमाणे ते मुद्रा धारण करीत.

पंढरीच्या पांडुरंगावर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यांचे वयोमान झाले, शरीर थकले. पंढरीची वारी त्यांच्याकडून होईना. पांडुरंगाचे दर्शन होत नाहीसे पाहून त्यांचे चित्त कळवळले. माउलीच्या भेटीविना तिचे लेकरू व्याकुळ झाले. या माउलीनेच आता आपला सांभाळ करावा, आपली लाज राखावी, असा विचार करीत करीत ते एकदा झोपले असताना त्यांना पांडुरंगाने दर्शन दिले. त्यांचा हात धरून त्यांना मळ्यात नेले. एका ठिकाणी बोट दाखवून त्याने म्हटले, ''इथे खणून पाहा. मी या जागी आहे. तुला पंढरीला येता येत नाही. मीच तुझ्याजवळ येतो.'' सकाळी लिंगोपंत खडबडून जागे झाले. स्वप्नातील दृश्य त्यांना समोर दिसत होते. परिचयाच्या मंडळींना घेऊन ते आपल्या मळ्यात गेले. स्वप्नात दिसलेली जागा त्यांनी खणून पाहिली. त्यांना तेथे विठ्ठलरखुमाईच्या सुंदर मूर्ती आढळल्या ! मायबाप पांडुरंगाचे कौतुक पाहून लिंगोपंतांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. सखा जिवलग पांडुरंग रखुमाईसह लिंगोपंतांच्या भेटीस आला. माउली लाडक्या लेकरास भेटली. सर्वांनी विठ्ठलनामाचा जयघोष केला. वाजतगाजत मूर्ती घरी आल्या. सुयोग्य मुहूर्त पाहून पंतांनी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आपल्या घरानजीकच केली. भजन, कीर्तन, नामस्मरण, अन्नदान यांनी सारे गोंदवले गाव मोहोरून निघाले. लिंगोपंतांच्या श्रद्धेची खूण 'विठोबाचा मळा' म्हणून 'गोंदवले' गावात आजही विद्यमान आहे.

❑❑❑

# "जाको राखे साइयाँ।"

- डॉ. सौ. सुनन्दा खेरडे
अमरावती.

## संत-स्मरण-महिमा

संत-स्मरण-दर्शन-वंदन अशा नवविधा भक्तींचा महिमा काय वर्णावा ! "**पाउले चालती पंढरीची वाट। दु:खी संसाराचा सोडुनिया घाट।**" तशीच वाट 'स्मृति-मणिमाला' ही जणू रोजच वाट चालत असते. स्मरणसाखळीचा वेग आणि आवेग सदोदित संतदर्शन घडवीत असतो. म्हणूनच म्हणतात :-

**"संत दरस को जाइये।
तज माया-अभिमान।
एक एक पग डालिए।
कोटी यग्य समान॥"**

एकेक 'नाममणी' म्हणजे एकेक पाऊल ! माया-आसक्ती-अभिमान सोडून टाकलेले एकेक नामस्मरणाचे पाऊल हे कोटीकोटी यज्ञांची प्राप्ती करून देते. पण, त्यासाठी अट आहे - ओढ, आतुरता आणि सर्वांगांनी मोहरहित होऊन केलेली 'नाम'मयता, संसाराची आसक्ती-माया-मोह हे बळकट पाश तोडून सर्वांगांनी आवेगाने सागराला कवटाळणाऱ्या नदीची समर्पण-उत्कंठा ! जे हे संसाराचे व्याप-ताप-संताप, उद्वेगपूर्ण-पोळणारे-जाच करणारे आहेत, त्यांतून मनमुक्त स्वतंत्रता !! यासाठी जी दर्शनाची आतुरता असावी लागते, तीच 'नाम'स्मरणाने सहजगत्या प्राप्त होते, माहेरची ओढ लागते, नभविहारी मुक्तसंचारी पक्षाची स्वच्छंदता अनुभवास येते. अशा अनेक अद्भुत किमया संतस्मरणात - 'नाम'मंत्रात एकवटलेल्या असतात.

**"कुमुदिनी काय जाणे तो परिमळ।
भ्रमर सकळ भोगितसे॥
तैसे तुज ठावे नाही तुझे 'नाम'।
आम्हीच ते प्रेमसुख जाणो॥
पौर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन।
तैसे माझे मन वाट पाहे॥"**

अशी तुकोबाराय साक्ष देतात. असा होतो नामस्मरणाचा परमानंद !

## संतकृपेचा अमृतयोग

संतकृपेशिवाय संतदर्शन होणे अशक्य ! आतुरता, उत्कंठा असूनही, 'नाम'जप सुरू असूनही संतदर्शनासाठी संतकृपेची वाट पहावी लागते.

**"तुका म्हणे नाही चालत तातडी।
प्राप्तकाळ घडी आल्याविण॥"**

अर्थात, मानसमंदिरात मनोभावे पूजनात असलेली परमपूज्य साईबाबांची मूर्ती कृपा करील, तरच अशक्य ते शक्य होते, अघटित घडते, अद्‌भुत चमत्कार होतो आणि सहजगत्या दर्शन होते.

**"देव करी तरी। काय न होई।
दगडाचिये नयी। तरी जेल॥
फुटतील पाय। चालतील भिंती।
मेरूमषक येती। सम तुका॥
जलाचिया वरी। मुंगीयांच्या हारी।
अग्नीचे पाठारी। पीक होये॥
तुका म्हणे तये। केल्या नच होये।
अैसे आहे काय। जगामाजी॥"**

## अघटित घडे, गुरुकृपे ब्रह्म जोडे

संत-सद्गुरुंची कृपा ही जादूची कांडी आहे, संजीवनी

बुटी आहे, कामधेनु आहे, चिंतामणी आहे. अशी संतकृपा जेव्हा होते तेव्हा अघटित, अकल्पित अनुभव येतात. सद्‌गुरु साईबाबांची कृपा असंख्य भक्तांनी, श्रद्धावंतांनी, दूरस्थ आर्तांनी अनुभवल्याचे अनेक स्वानुभूत प्रसंग 'साईलीला' नियतकालिकात मी वाचलेले आहेत. नुकताच मलाही विलक्षण दर्शनानुभव आला. तो मी श्रद्धावनत होऊन श्री साईचरणी अर्पण करते.



**''जाको राखे साइयाँ।**
**मार सके ना कोय।**
**बाल न बाँका करि सकै।**
**जो जग बैरी होय॥''**

या दोह्याचा साक्षात् अनुभवच मी कथन करीत आहे...

## स्वानुभूती

माझे यजमान श्री. रामकृष्ण खेरडे (वय ७८), निवृत्त उपशिक्षणाधिकारी व स्वातंत्र्यसेनानी, वास्तव्य अमरावती, यांनी योगासने व नौली, नौती, धोती या योगक्रियांचा आजन्म नियम पाळला. परंतु, गेल्या दीड वर्षापासून छातीत उजवीकडे रात्री व सकाळी दुखणे सुरू झाले. हृदयरोगाचे निदान झाले. अमरावती व नागपूरच्या विविध हृदयविशेषज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, इको-एंजिओप्लास्टी इत्यादी झाले. जवळजवळ १०-१२ हजारांच्या गोळ्या-औषधेही झाली. परंतु, दुखणे कायम ! शेवटी 'बायपास सर्जरी' करण्याचे ठरले. माझा मुलगा पुण्याला डॉक्टर असल्याने त्याच्या सहाय्याने पुण्याच्या 'वाडिया'मधील हृदयविशेषज्ञ डॉ. साठे यांनी 'सीडी'-कॅसेट, औषधे वगैरे पाहून निर्णय दिला की, यांना सर्जरीची गरज नाही. मुख्य हृदयाला काहीही झालेले नाही. रक्तवाहिन्यांमध्ये फक्त दोन जागी २०% व ३०% अडथळा आहे; तो औषधाने ठीक होईल; फक्त चरबीयुक्त व तेलकट पदार्थ बंद करावे आणि १ किलोमीटर रोज फिरायला जावे. त्यांनी सर्व महागडी औषधे बंद करून फक्त तीन प्रकारच्या स्वस्त गोळ्या दिल्या. त्यामुळे दुखणे थांबले. आज ते स्वस्थ आहेत. अशाप्रकारे ज्यांच्या नामस्मरणाचा मला छंद आहे, त्या दैवीशक्ती व संत-सद्‌गुरुकृपेने अघटित घडले ! इतकेच नव्हे, तर 'अष्टविनायक दर्शन' व 'श्री साईबाबा दर्शन' यांची सुवर्ण पर्वणीदेखील लाभली. एक तपापूर्वी ज्या साईबाबांचे दर्शन घडले होते, त्यांनी आपल्या चरणांशी बोलावून दर्शन दिले, हे महद्‌भाग्यच नव्हे काय ! संतकृपेशिवाय अशी अद्‌भुत किमया घडणे अशक्यच !! म्हणून, म्हणावेसे वाटते :-

**''जाको राखे साइयाँ**
**मार सके ना कोय॥**
**बाल न बाँका करि सकै**
**जो जग बैरी होय॥''**

## श्री साईदर्शनाचा अभूतपूर्व परमानंद

एक तपानंतर साईमंदिरपरिसर मी सहकुटुंब अनुभवत होते, उपभोगत होते. विशाल मंदिरपरिसर, दर्शनाभिलाषी भक्तगणांच्या हॉलमधील व्यवस्थित रांगा, जागोजागी असलेले टी.व्ही. सेट्स, तैलचित्रे, तसेच साईबाबांची वचनामृत वाणी यांमुळे भक्तिभाव उचंबळून आला होता.

धूप-अगरबत्ती-सुगंधी पुष्पे-प्रसाद यांसह भक्तमालिका हळूहळू पुढे सरकत होती. त्याचवेळी दुपारची आरती सुरू झाली. शिस्तीत सर्वजण जागीच थांबले. ध्वनिक्षेपक आरतीचे स्वर वातावरणात वितरित होते व टी.व्ही. सेट्समध्ये प्रत्यक्ष आरती दिसत होती आणि मूर्तीचे विलोभनीय दर्शन घडत होते. दर्शनातुरांची तहानभूक तृप्त होत होती. **''तो सुखसोहळा अनुपम.''** सुखनिधान गवसले होते.

त्या अनुभवाचे - पर्वणीचे शब्दरूप म्हणजे :-

**''आनंदाचे डोही आनंद तरंग।**
**आनंदचि अंग आनंदाचे ॥''**

गळ्यात तुळशी माळ व डोक्यावर तुळस घेऊन आषाढी-कार्तिकीला नित्यनेमाने पंढरीची वारी करणारे भक्तभागवत ज्या आकंठ तृप्तीची अनुभूती घेतात, तशीच अनुभूती येऊन सर्वांगी रोमांच फुलले. दर्शनार्थींची रांग पुढेपुढे सरकत होती, तसतशी उत्कंठा वाढत होती. शेवटी तो 'अमृतयोग' आला. दर्शनानंदाने तनमन न्हाऊन निघाले. 'साष्टांग प्रणिपात' करून देहाचे सोने झाले. हात नकळत जुळले आणि शब्द उमटले :-

**''ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे**
**त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे**
**मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी**
**तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥''**

मी साई-दर्शनाने धन्य झाले. एका अद्भुत भक्तिरसाची अनुभूती आली. मन तृप्त-तृप्त झाले. आशीर्वाद-कृपादृष्टीची नेमज्योती साईबाबांच्या मातृदृष्टीतून अनुभवली.

त्यानंतर परिसरातील द्वारकामाई-कल्पतरू-भक्तिधाम या स्थळांच्या दर्शनाने साईदर्शनाच्या सोहळ्याची सांगता झाली; कृतार्थता लाभली. सहजगत्या भगवद्गीता-वचन आठवले. श्री साईबाबा जणू सुचवत होते :-

**''पत्रं पुष्पं फलं तोयं।**
**यो मे भक्त्या प्रयच्छते ॥**
**तेषाम् नित्याभियुक्तानाम्।**
**योगक्षेमं वहाम्यहम् ॥''**

म्हणूनच :-

**''मय्येव मन आधत्स्व।**
**मयि बुद्धिं निवेषय**
**अहं त्वां सर्व-पापेभ्यो**
**मोक्षयिष्यामि मा शुच ॥''**

अर्थात : -

**''कृपासिंधु योगीराज परब्रह्म**
**ओम श्री साईनाथाय नम:''**

हा महामंत्र देहाच्या अणुरेणूतून प्रस्फुटित होऊ लागला.

## 'साईलीला' अपरंपार

साईदर्शनसमयी नकळत हात जुळले. त्यावेळी साईबाबांच्या आश्वासक नेत्रकमलांकडे अनिमिष नेत्रांनी पाहताच एक धिरोदात्त विश्वास लाभला. 'श्रद्धा व सबुरी'चा महामंत्र कानामनात गुंजारव घालू लागला आणि मोह-माया-काम-क्रोध-लोभ-मत्सर या षड्रिपूंना नामोहरम करणारे प्रचंड बळ मनात लाटांप्रमाणे उसळून आले. शुद्ध अष्टसात्विक भाव देहाच्या रोमारोमात जागृत होताच वाटले,

**''याचिसाठी केला होता अट्टाहास।''**

**'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्'** सामर्थ्य लाभलेल्या जागृत देवस्थानस्थित योगिराज परब्रह्मस्वरूप श्री साईबाबांकडे दान मागताना तुकोबांच्या शब्दसरी सरसरल्या :-

**हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा ॥**
**गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी ॥**
**न लगे मुक्ती धनसंपदा। संतसंग देई सदा ॥**
**तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे अम्हासी ॥**

अशाप्रकारे साईदर्शन घेऊन कृतार्थ झाले !

❑❑❑

साईभक्ताचे मत

# साईबाबांच्या मानवधर्माचा प्रचार व प्रसार होणे ही काळाची गरज

- प्रतापराव इंदूराव निंबाळकर
(चित्रपट दिग्दर्शक)

महाराष्ट्राला साधुसंतांची थोर परंपरा आहे, तद्वतच मराठी चित्रपटसृष्टीला उत्तमोत्तम संतपटांची परंपरा आहे. प्रभात फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम' या संतपटाला केवळ भारतातच नव्हे, तर चक्क परदेशातही उदंड प्रतिसाद मिळाला होता. १९६० साली निर्माण झालेला **'शिरडीचे श्री साईबाबा'** हा मराठी भाषेतील एक संतपट म्हणता येईल.

त्यावेळचे नामवंत दिग्दर्शक श्री. कुमारसेन समर्थ (आजच्या काजोल अभिनेत्रीचे आजोबा) यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात नटवर्य दत्तोपंत आंग्रे यांनी 'श्री साईबाबांची' भूमिका केली असून; श्री साईबाबांची अशी भूमिका पुन्हा होणे नाही, असे उद्‌गार समीक्षकांनी - रसिकांनी त्यावेळी काढले, ते आजही खरे ठरले आहेत. १९६० साली श्री. कुमारसेन समर्थ यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट श्री साईबाबांवरील पहिला चित्रपट होय ! त्यानंतर मनोजकुमार आदिंनीही श्री साईबाबांवर चित्रपट काढले, वेगवेगळ्या अभिनेत्यांनी त्यांत श्री साईबाबांची भूमिका केली; पण १९६० सालच्या चित्रपटात दत्तोपंत आंग्रे यांनी साकारलेल्या श्री साईबाबांची सर कोणालाच नाही. अभिनेते विष्णुपंत पागनीस म्हणजे 'संत तुकाराम', अभिनेते शाहू मोडक म्हणजे 'संत ज्ञानेश्वर', तसे दत्तोपंत आंग्रे म्हणजे 'श्री साईबाबा'.

१९६० साली निघालेल्या 'शिरडीचे श्री साईबाबा' या श्री साईबाबांवरील पहिल्या चित्रपटाला प्रसिद्ध संगीतकार पांडुरंग दीक्षित यांचे संगीत लाभलेले आहे. **''शिरडी माझे पंढरपूर'', ''रहम नजर करो अब मोरे साई'', ''आज दिवाळी''** ही त्यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आजही अवीट गोडीची ठरली आहेत. या चित्रपटनिर्मितीत मला खारीचा वाटा उचलता आला, हे मी माझे भाग्य समजतो. सहाय्यक संकलक म्हणून मला या चित्रपटाचे काम मिळाले, ही मी श्री साईबाबांचीच कृपा मानतो. माझे वडील कै. इंदूराव निंबाळकर हे नट म्हणून त्यावेळी विविध चित्रपटांमध्ये काम करीत होते. एक नामवंत अभिनेता म्हणून त्यांच्याकडे चित्रपटसृष्टीत आदराने पाहिले जात होते. मला चित्रपटसृष्टीचे बाळकडू लाभले ते त्यांच्याकडूनच ! सध्या **'चोरांची आळंदी'** नावाच्या चित्रपटाच्या निर्मितीत मी व्यस्त आहे.

'श्री साईबाबा' हे माझे श्रद्धास्थान आहे. दीनदुबळ्यांची सेवा, सर्वधर्मसमभाव हा महान संदेश श्री साईबाबांनी दिला आहे. प्रत्यक्ष आचरणातून त्यांनी धर्माचे मार्गदर्शन केले आहे.

आज माणसे आपापल्या पंथाला धरून राहिली असल्याने संकुचित झाली आहेत. संतांची जातीवार वाटणी करून घेऊन आपापल्या जातीच्या संतांचा, संदेश-उपदेश समजावून न घेताच नुसता उदोउदो करण्याचे सोहळे साजरे होत आहेत. श्री साईबाबा हे सर्व पंथ व धर्मभेदांच्या वर आहेत. ते मानवधर्माचे पुरस्कर्ते आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनात बाबांचा मानवधर्म हाच जगाच्या कानाकोपऱ्यात स्वीकारला जाईल. भाषा, पंथ, देश असे सारे भेद केवळ साईभक्तीमुळे दूर होतात. आज माणसाने माणूस म्हणून जगण्याची गरज आहे. हे माणूसपण त्याला साईबाबांच्या कृतिशील धर्माचरणातून मिळू शकते, असे मला खात्रीपूर्वक वाटते. म्हणूनच सर्वत्र साईभक्तीचा प्रचार व प्रसार होणे अत्याधिक गरजेचे आहे.

❑❑❑

# महात्मा बसवेश्वर : जीवन आणि कार्य

- सुनिल रुकारी

इ. स. ११३१ मध्ये सध्याच्या विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी बसवेश्वरांचा जन्म झाला. त्यांचे वडील मांदिराज हे शैव ब्राह्मण होते. ते बागेवाडीचे ग्रामनेते होते. बसवेश्वरांच्या मातेचे नाव मादलांबिका असे होते. पुत्रप्राप्तीसाठी मादलांबेने नंदिकेश्वराला साकडे घातले आणि बसवेश्वरांचा जन्म झाला. म्हणूनच 'बसव' असे नंदीचेच नाव (वृषभ) त्यांना देण्यात आले. अक्कनागम्मा नावाची बहीणही त्यांना होती.

बसवेश्वरांचे आई-वडील विद्येची आवड असणारे होते. घरात कुलाचार, संस्कार, कर्मकांड कडक असत. त्यामुळे लहानवयापासून भक्तिभावना बसवेश्वरांच्या मनीमानसी रुजली. बागेवाडीबरोबरच इंगळेश्वर येथे आपल्या मामांच्या घरी बसवेश्वर काही काळ राहिले. ते आठ वर्षांचे झाल्यावर त्यांची मुंज करण्याचा प्रस्ताव पुढे आला. परंतु, मुलींना उपनयन संस्काराचा अधिकार नाही, हे समजल्यावर बसवेश्वरांनी मुंज करून घेण्याचे नाकारले. स्वतंत्र विचार करण्याची आणि ते छातीठोकपणे व्यक्त करण्याची बसवेश्वरांची वृत्ती याप्रमाणे बालवयातच प्रगट झाली. त्या वयात घरच्या मंडळींच्या रोषाला पात्र होऊन द्रोही ठरल्यावरदेखील ते निराश झाले नाहीत. त्यांनी घर सोडले आणि कुडलसंगम या ठिकाणी जातवेदमुनींजवळ आश्रमात जाऊन राहिले. त्यांनी एक तप तेथे अध्ययन केले.

त्यानंतर बसवेश्वरांना पंडित म्हणून मान-मान्यता प्राप्त झाली. एक सत्त्वसंपन्न शिवोपासक सिद्धपुरुष अशीही त्यांची ख्याती झाली. बसवेश्वरांचे मामा बलदेव हे राजा बिज्जल यांच्या दरबारी अधिकारी पदावर होते. त्यांनी आपली कन्या गंगाबिका ही भाच्याला देऊ केली. बसवेश्वरांची बहीण नागांबिका हिचा विवाहही कुडलसंगमच्या शिवदेव नामक थोर शिवशरणाशी झाला



होता. ती वयाने बसवेश्वरांपेक्षा बरीच मोठी होती. तिचा पुत्र चन्नबसव हाही सुसंस्कारित झाला आणि त्याने आपल्या मामांना, बसवेश्वरांना त्यांच्या कार्यामध्ये जन्मभर साथ दिली.

इ. स. ११५० मध्ये बसवेश्वरांना स्वप्नात ईश्वरी आदेश प्राप्त झाला आणि त्यानुसार त्यांनी मंगळवेढ्याकडे प्रयाण केले. ती तर बिज्जल राजाची राजधानी होती. तेथे जाऊन बसवेश्वर प्रथम प्रशासनाच्या सेवाचाकरीत दाखल झाले. तेथे अचानक एक जुना ताम्रपट सापडला. त्यावरील मजकुराचे वाचन कुणालाच करता येईना. बसवेश्वरांनी त्याचा उलगडा केला व त्यामुळे एका गुप्त खजिन्याचा शोध लागणे शक्य झाले. त्यावरून बसवेश्वरांची योग्यता सर्वांना

कळून आली आणि त्यांना कोषाध्यक्ष करण्यात आले. पण, त्यांनी आपली शिवभक्ती-साधना सातत्याने सुरू ठेवली. दरबारच्या कुठल्याच सुखविलासाशी ते समरस झाले नाहीत. त्यांच्या दृष्टीने राजसेवा ही प्रजासेवा होती.

कल्याणी येथे चालुक्यांची महासत्ता होती. ११५१ साली जगदेवमल्लानंतर तैल हा सम्राट बनला. तो दुबळा होता. त्याने प्रभावी बिज्जलाला जवळ करून त्यास महाप्रधानपद बहाल केले. बिज्जलाबरोबर बसवेश्वरही कल्याणीमध्ये आले आणि तेथे त्यांना राज्यभांडारीपद मिळाले. ११६२ मध्ये बलदेवाच्या मृत्यूनंतर त्यांना मंत्रीपद देण्यात आले. तैलराजा वरंगळवर गेल्याचे पाहून बिज्जलाने त्याच्या पश्चात राजगादी टिकविल्यासारखे भासवून १० वर्षे हुशारीने राजकारण केले व नंतर स्वतःला सम्राट म्हणून घोषित केले. बसवेश्वर त्याचे मुख्यमंत्री झाले.

या नाट्यमय, राजकीय जीवनयात्रेबरोबरच बसवेश्वरांची परमार्थ यात्रा अखंडपणे चालू होती. समाजातील प्रचलित शिवाराधनेला नवे कालोचित वळण देण्यास त्यांनी आरंभ केला व त्यांच्या ध्यानी आले की, वेदभाषा संपन्न आहे खरी; पण तिला देवभाषा म्हणून सर्वसामान्य माणसापासून दूर ठेवले आहे. त्यामुळे त्या अवघड भाषेतील ज्ञानसागरापासून स्त्रिया, शूद्र असे लक्षावधी लोक वंचित झाले आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी लोकभाषेचा स्वीकार करून सद्धर्म आणि विशुद्ध ज्ञान यांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे व्रत त्यांनी अंगिकारले. त्यासाठी स्मृती आणि पुरोहितशाहीला शह देणे भाग होते. समाजातील जातीभेद नष्ट व्हावेत आणि स्त्रियांना समान हक्क मिळावेत म्हणून त्यांनी लोकचळवळ सुरू केली. त्यांच्या नवविचारांना दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकीय प्रदेशात पुष्कळ अनुकूलता मिळाली. बसवेश्वरांनी आपल्या पंथाचे नाव 'क्रांतिसूचक' ठेवले; पण ते मूळ उपासना संप्रदायाशी मिळते-जुळते राखले. तोवर उपासक शैव होतेच; पण बसवेश्वरांनी त्यांना वीरत्वाची जोड दिली. हे वीरत्व अंधरूढी-कल्पनांचे उच्चाटन, समतेचा उद्घोष आणि नीती-न्यायाचे रक्षण यासाठी होते. महात्मा बसवेश्वरांचा भर सहज-भक्ती-साधनेवर होता. कोणत्याही प्रकारचे अवडंबर त्यांना मान्य नव्हते. ते महात्मा ठरले; कारण त्यांनी जुन्याला नवेपण दिले. आपण नवा धर्म सांगत आहोत, अशी त्यांची आग्रही भूमिका नव्हतीच. त्यांच्या क्रांतिकार्याने एकदम समाजमनाची पकड घेतली. त्यांचे सर्वांत महत्त्वाचे तत्त्व होते ''कायकवे कैलास'', म्हणजे श्रमातूनच शिवप्राप्ती होते. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आणि जाती-पातींचे उच्चाटन केले; म्हणून त्यांना इतिहासातील 'पहिला साम्यवादी' असेही म्हटले जाते.

आपल्या विचारांच्या प्रसाराकरिता त्यांनी राजनगरी कल्याणीमध्ये शून्यपीठाची स्थापना केली आणि 'अनुभव मंटप' या नावाने धर्मसंसदही प्रस्थापित केली. त्यामध्ये त्यांना अल्लम प्रभु, सिद्ध रामेश्वर आणि अनेक वीरशैव संतांची जोड मिळाली. त्यांची उपलब्ध वचने दीडहजाराच्या घरात आहेत. ही स्फुट स्वरूपाची भक्तिरचना सूत्रमय स्वरूपाची आहे. समता, बंधुता व श्रम-प्रतिष्ठा ही त्यांच्या क्रांतिकार्याची त्रिसूत्री होती. उच्च-नीच, जाती-जमाती, पंथोपपंथ असा कोणताही भेद त्यांच्या अनुभव मंटपात नव्हता. तेथे पुरुषांच्या बरोबर स्त्रियाही चर्चा, संवाद करीत. त्यामुळे वीरशैव रत्नांच्या मालिकेत कित्येक स्त्री-संतांचा आढळ होतो. बसवेश्वरांच्या प्रेरणेने देशभर ठिकठिकाणी वीरशैव मठ स्थापन झाले आणि सर्व देशात वीरशैव पंथाची प्रतिष्ठा वाढू लागली. मात्र, एका प्रतिष्ठित ब्राह्मण कुळातील मुलीचा विवाह एका अस्पृश्याशी घडवून आणण्यात बसवेश्वरांनी पुढाकार घेतल्यामुळे त्यांच्याविरुद्ध सनातन्यांनी मोठीच हाकाटी केली. प्रशासनाकडून अविवेकाने काही वीरशैव क्रांतिकारकांचा वध करण्यात आला. त्यामुळे बसवेश्वर मनोमन खिन्न झाले. या वादामध्ये का संतप्त वीरशैवाने प्रत्यक्ष बिज्जलावर हल्ला केला. त्यामुळे खिन्न झालेल्या बसवेश्वरांनी पुन्हा कुडलसंगमला प्रयाण केले. तेथे त्यांनी निश्चयपूर्वक देह ठेवला. त्यापाठोपाठ कल्याणीची कलचुरी राजवटही अस्ताला गेली. ही गोष्ट घडली तेव्हा इ. स. ११६७ होते आणि बसवेश्वरांचे वय केवळ छत्तीस होते.

❑❑❑



# तेथे कर माझे जुळती :

## नित्यपठणासाठी उपयुक्त पुस्तिका

ग्रंथ परिचय




**दा**णोली (सावंतवाडी) येथील सुप्रसिद्ध सद्गुरु श्री समर्थ साटम महाराज यांची कृपा, वरदहस्त लाभलेले श्री. दिनकर देवळेकर यांनी श्री साटम महाराजांचे ओवीबद्ध चरित्र 'लीलामृत' या नावाने प्रसिद्ध केले आहे. हे चरित्र पोथीरूपाने घरोघरी निष्ठेने, श्रद्धेने वाचले जात आहे. दाणोलीस समर्थांच्या मंदिरात त्यांच्या पश्चात राहणारे प. पू. श्री सदानंद सरस्वती हे श्री. देवळेकरांचे आध्यात्मिक गुरु. गुरु-आशीर्वादामुळे सद्गुरु श्री साटम महाराज यांच्यावर वरद-स्तोत्र, संक्षिप्त स्तोत्र, चरित्र ग्रंथ, आरत्या असे विविध लेखन त्यांनी केले आहे. सद्गुरुभक्तांना नित्याच्या धावपळीच्या जगात नेमकी गुरुसेवा करता यावी यासाठी त्यांनी ''तेथे कर माझे जुळती'' ही छोटेखानी उपासना पुस्तिका प्रसिद्ध केली आहे.

सदर पुस्तिकेत सद्गुरु श्री साटम महाराजांचे अल्प चरित्र सुरुवातीला देऊन भाविकांना महाराजांचा परिचय करून देण्यात आला आहे. त्यानंतर श्री साटम लीलामृत हे ओवीबद्ध छोटे स्तोत्र (१२६ ओव्यांचे) त्यांनी नित्यपठणासाठी उपलब्ध केले आहे. तसेच, केणी मास्तरकृत श्री साटम स्तोत्र, श्री. विनायक कापडी यांचे साटम स्तवन, त्याचबरोबर महाराजांवरील विविध आरत्यांचाही सदर पुस्तिकेत समावेश करण्यात आला आहे. नित्यपठणाची पारंपरिक स्तोत्रेही या पुस्तिकेत देण्यात आली असून श्री टेंबे महाराज यांचे अघोर-कष्टोद्धरण स्तोत्र (सर्वसंकटहारक), पुत्रप्राप्तीचे महालक्ष्मी स्तोत्र, महामृत्युंजय जप, देवीमंत्र, रामरक्षा, अथर्वशीर्ष यांच्या समावेशाबरोबरच नेहमीच्या पारंपरिक आरत्याही पुस्तिकेत देण्यात आल्या आहेत.

शेवट 'कुलदेवतेची सेवा' या लेखात कुळधर्म, कुलाचार करणे कसे अत्यावश्यक आहे, याचे यथार्थ विवेचन देण्यात आले असून, जर कुलदेवता माहीत नसेल तर ती कशी ओळखावी, याबाबतही भाविकांना नेमके मार्गदर्शन श्री. देवळेकर यांनी केले आहे.

सद्गुरु श्री साटम महाराजांच्या सर्व भक्तांना नित्यपठणासाठी ही छोटेखानी उपासना पुस्तिका निश्चित उपयुक्त ठरेल.

**- प्रतिनिधी**

**तेथे कर माझे जुळती**
दिनकर महादेव देवळेकर
प्रकाशक : शरद मोये,
६ स्नेह, डी. एस. बाबरेकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०२८.
मूल्य : रु. ११/-  पृष्ठे : ६४

❑❑❑

# 'ज्ञानेश्वरी'चा सिंधी भाषेत अनुवाद :

## प्रा. हर्दवाणींचे कार्य

संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' ही भगवद्गीतेवरील टीका अनेक अभ्यासकांचा आकर्षणाचा विषय ठरली आहे. गीतेवर अनेक टीकाग्रंथ अनेक भाषांत उपलब्ध आहेत. पण, श्रीमद् आद्य शंकराचार्यांच्या संस्कृत टीकेनंतर संत ज्ञानेश्वरीचा मराठी टीकाग्रंथच विद्वानांनी डोक्यावर घेतला आहे. ज्ञानेश्वरीचे हे टीकाग्रंथ - काव्यग्रंथ म्हणून असलेले माहात्म्य लक्षात घेऊन अनेकांनी या ग्रंथाचे विविध भाषांत अनुवादही केलेले आहेत.

सिंधी साहित्यातील एक नामवंत लेखक व विद्वान प्रा. लक्ष्मण हर्दवाणी यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचा सिंधी भाषेत अनुवाद केला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या अनुवादाचे महत्त्व लक्षात घेऊन या उपक्रमास भरीव अनुदान दिले आहे. त्याचप्रमाणे इतर अनेक संस्था व संघटनांनी या अनुवाद प्रकल्पास मदत केलेली आहे.

गीतेचे संस्कृत श्लोक, त्याखाली ज्ञानेश्वरीतील मराठी ओव्यांचा सिंधी अनुवाद आणि तोही देवनागरी लिपीत देण्यात आलेला आहे. त्यामुळे सिंधी समाजातील सिंधी लिपीची ओळख नसणाऱ्या नव्या पिढीला हा ग्रंथ सहज व सुलभतेने वाचता येईल.

जगभर पसरलेल्या सुजाण सिंधी बांधवांपर्यंत ज्ञानेश्वरीचा संदेश पोहोचावा, या भावनेने प्रा. हर्दवाणी यांनी अनेक वर्षे अथक परिश्रम करून हे अनुवादाचे कार्य केलेले आहे. ग्रंथ अत्यंत देखणा असून मूल्य केवळ रु. २०० ठेवण्यात आलेले आहे.

**– ना. रा. कदम, मुंबई**
(अध्यक्ष, भारतीय साहित्य सेवक संघ)

**सिंधी ज्ञानेश्वरी**
अनुवादक : प्रा. लक्ष्मण हर्दवाणी
'कविता', प्रोफेसर कॉलनी, अहमदनगर.

# सर्व रोगांवर एकच औषध : प्रसन्नता

(पं. श्रीराम शर्मा आचार्य)

सर्व प्रकारच्या वाईट विचारांपासून दूर राहणे, हा प्रसन्न राहण्याचा सर्वोत्तम उपाय होय ! जास्त प्रसन्न राहण्याचा प्रयत्न करा ! तुमच्या अडी-अडचणी व चिंता अगदी असह्य प्रमाणात वाढल्या असतील तर, एखाद्या आदरणीय व्यक्तीजवळ त्या प्रगट करून त्या व्यक्तीचे प्रोत्साहन आणि सहानुभूती मिळवा ! त्यामुळे तुम्हाला प्रसन्नता लाभेल. आपली माता, पिता, मित्र वा पत्नी कुणाजवळही आपली वेदना व्यक्त करा, अगदी मनापासून त्यांना आपले दुःख सांगा ! म्हणजे तुमच्या मनावरील ताण कमी होईल व तुम्हाला प्रसन्नता वाटेल.

सर्व रोगांवर एकच औषध म्हणजे, 'प्रसन्नता' आणि प्रसन्न राहण्यासाठी एकच उपाय म्हणजे, आपले जीवन निष्पाप बनविणे. निष्कलंक, निष्पाप आणि हलके-फुलके जीवन व्यतीत करणारा मनुष्यच प्रसन्न राहू शकतो. मनाची सत्य स्थिती जाणून घेण्यासाठी कठोर आत्मपरीक्षणाची वृत्ती बाणली पाहिजे. मन इतका भारी वकील आहे की, तो आपल्या बाजूने अनेक पुरावे दाखल करतो. आपल्या प्रत्येक गोष्टीकडे उदार मनाने पाहण्याची आणि इतरांच्या कार्यात उणीव शोधण्याची सामान्य माणसाची प्रवृत्ती असते. दुसऱ्याने विशेष धन मिळवले असेल, तर ईर्षेने प्रेरित होऊन, त्याने चोरी, भरमसाठ नफेबाजी व धोकेबाजी केली, असे शेरे मारले जातात. आमच्याबाबतीत मात्र ते बुद्धिकौशल्य ठरते. ईर्ष्या, क्रोध आणि कलहाचे मुख्य कारण म्हणजे, परीक्षणातील स्वार्थी दृष्टिकोन.

(सौजन्य : शांतिकुंज, हरिद्वार)

चिंतन



# देवघर

- डॉ. बाळाजी आठवले
सनातन प्रभात

आपल्यातील प्रत्येकजण रोज देवाचं काहीतरी करीतच असतो; उदा. पूजा-अर्चा, पोथीवाचन करणे, नामजप, देवळात जाणे वगैरे वगैरे. पण, हे सर्व आपण कशासाठी करीत असतो, याचा विचार जर केला, तर असे लक्षात येते की, या सर्व कृतींमधून आपण मानसिक शांती व आनंद शोधत असतो. ही शांती किंवा आनंद आपल्याला खरंच मिळतो का ? या प्रश्नाचे उत्तर देताना असे म्हणावे लागेल की, फारच थोड्या वेळा हा आनंद आपल्याला मिळतो. याचे कारण म्हणजे, बऱ्याचदा आपण या सर्व कृती भावहीनपणे करीत असतो. त्यांचे स्वरूप यांत्रिक असते. आपण शरीराने हे सर्व करीत असतो; पण मनाने आपण कशातच नसतो. तसेच, याचे दुसरे कारण म्हणजे, आपण कुठल्याही गोष्टीमागील शास्त्र जाणून व समजून घेत नाही. शास्त्र समजून घेऊन जेवढी अचूक व योग्य कृती करू, तेवढ्या अधिक प्रमाणात आपल्याला आनंद मिळतो.

मुळात आपल्याला परमेश्वराची आवड का असते ? तर, आपणा सर्वांतच ईश्वरी अंश आहे आणि त्यामुळेच आपल्याला स्वभावतःच ईश्वराची ओढ असते. हा ईश्वर सत्-चित्-आनंद (सच्चिदानंद), म्हणजेच सदैव आनंदी असा आहे. म्हणूनच, आपल्यालाही सदैव आनंदी राहायला आवडते. ईश्वराकडे जाण्याचे विविध मार्ग आहेत. पैकी, **कलियुगात भक्तियोग हा मार्ग सर्वांकरिता सहजसुलभ आहे.** भक्तिमार्गाने साधना करणाऱ्यांपैकी बहुतेकजण पूजा-अर्चा, देवळात जाणे, पोथ्यापुराणे वाचणे आदि माध्यमांतून आनंदी राहण्याचा किंवा आनंद मिळविण्याचा प्रयत्न करतात. देवपूजा करणाऱ्या प्रत्येकाच्या घरातील देवघराची मांडणी पुढीलप्रकारे शास्त्रोक्त पद्धतीने केलेली असल्यास त्यांना हा आनंद निश्चितच मिळेल.

देवघराचे तोंड हे पूर्वेला अथवा पश्चिमेला असावे. देवघरात खूप देव किंवा एकाच प्रकारचे एकाहून जास्त देव, उदा. वेगवेगळ्या देवस्थानांतून आणलेले दोन-दोन गणपती, तसेच लग्नात मिळालेल्या तीन-तीन अन्नपूर्णा वगैरे, नसावेत; कारण अनेकांतून एकात जाणे हे साधनेच्या मूलभूत तत्त्वांपैकी एक तत्त्व आहे. देवघरात देवांची मांडणी करताना गणपती मध्यभागी ठेवावा; कारण **'गण', म्हणजे 'दिशा' व 'पती', म्हणजे 'स्वामी'; म्हणून 'दिशांचा स्वामी' तो 'गणपती', असे गणपतीचे वर्णन करता येईल. गणपती दिशांचा स्वामी असल्याने इतर कुठलीही देवता गणपतीच्या परवानगीशिवाय कोणत्याही दिशेने येऊ शकत नाही आणि म्हणूनच, कोणतेही मंगलकार्य वा इतर कोणत्याही देवतेची पूजा करताना प्रथम 'गणपती-पूजन' करतात.** गणपतीने एकदा दिशा मोकळ्या केल्या की, ज्या देवतेची आपण पूजा करीत असतो ती तेथे येऊ शकते. आपण बोलतो ती 'नादभाषा - शब्दभाषा' केवळ गणपतीच समजू शकतो. अन्य देवतांची भाषा ही 'प्रकाशभाषा' असल्याने त्यांना आपली भाषा समजत नाही. पण, गणपतीला ती कळत असल्याने तो आपल्या नादभाषेचे देवतांना समजणाऱ्या प्रकाशभाषेत रूपांतर करू शकतो. देवघरात गणपतीच्या उजव्या बाजूला कुलदेव व डाव्या बाजूला कुलदेवी ठेवावी. हनुमान, बाळकृष्ण आदि पुरुषदेव कुलदेवाच्या उजव्या बाजूला, तर अन्नपूर्णादि स्त्रीदेवता कुलदेवीच्या डाव्या बाजूस ठेवाव्यात.

देवळात गेल्यावर किंवा देवाची पूजा केल्यावर आपल्याला अतिशय प्रसन्न व आनंदी वाटते. हा आनंद सदैव टिकावा, असे आपल्याला मनोमन वाटत असते; पण वेळेअभावी म्हणा किंवा घरातील इतर कौटुंबिक

*(पृष्ठ क्र. ४४ वर)*

# "माझ्यासाठी देव" ते "मी देवासाठी"

- डॉ. उर्मिला कृ. तेली
मुंबई.

आपण बहुतांश लोक प्रथम जेव्हा देवास नमस्कार करतो तेव्हा आपणास काहीतरी हवे म्हणून करतो. जाणीवपूर्वक जेव्हा आपण देव मानू लागतो तेव्हा "देव माझ्यासाठी आहे" येथून सुरुवात होते. पुढे नियमित साधना सुरू ठेवली, तर परमार्थमार्गातील अनेक कप्पे उलगडत जातात.

"माझ्यासाठी देव" ते "मी देवासाठी" हा एक मधुर प्रवास आहे. विशेषतः, जेव्हा जीवनात संकटे येतात तेव्हा परमेश्वरावर विश्वास ठेवावा की ठेवू नये, याचा विचार प्रत्येक सामान्य व्यक्तीच्या मनात येतो, मनाची दोलायमान स्थिती होते. पण, यातही नियमित केलेल्या साधनेतील संस्कार नकळत भक्ताच्या मनावर खोलवर बिंबलेले असतात. कठीण प्रसंग तोलण्यासाठी लागणारे मनोबल भक्तांकडे जास्त असते.

> **संकटकाळात मनासारखे घडत नसते तेव्हा अनेकांची आपल्या देवतेवरची - सद्‌गुरुवरची श्रद्धा डळमळीत होते व ते अन्य आधार शोधू लागतात. यात त्यांची नाहक फरफट होते. याउलट संकटात श्रद्धेएवढेच सबुरीचे महत्त्व ओळखून भक्तांनी ठामपणे संकटांना सामोरे गेले पाहिजे.**

संकटांच्या पलीकडे सद्‌गुरुला पाहिले की, त्याचे खरे स्वरूप समजते; अन्यथा मन सदैव अस्थिर राहते. जनमानसात असा समज आहे की, परमार्थाकडे म्हातारपणीच वळावे व मन रमवावे. पण, हीच सुरुवात जर लहानपणापासूनच केली, तर तरुण पिढीतील अनेक दोष नष्ट होऊ शकतील. तरुण पिढी अधिक समर्थपणे जीवनातील आव्हाने स्वीकारू शकेल.

जीवनातील २० ते ५० वर्षे वयोमानात अनेक महत्त्वाच्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. यामध्ये काही प्रसंग खरेच मनाला चटका लावून जातात. उदा. शैक्षणिक वाटचालीतील अपयश, कारकिर्दीच्या मार्गातील अडथळे, हितशत्रूंच्या त्रासाने नोकरी वा व्यवसायात आलेली अस्थिरता, स्वतःच्या मुलांचे वा जवळच्या नातलगांचे मृत्यू, असाध्य रोगांमुळे झालेली शारीरिक, मानसिक, आर्थिक हानी अशा प्रसंगांतून सावरून जाताना अनेक वेळा आपली श्रद्धा संकटांत सापडते. पण, सबुरीच्या जोरावर जर आपण आलेल्या कठीण प्रसंगांतून मार्ग काढण्याचा योग्य प्रयत्न केला तर मार्ग निश्चितच सापडतो. अशाप्रकारे श्रद्धा व सबुरी या जुळ्या बहिणी आपले अस्तित्व खऱ्या भक्तास पदोपदी जाणवून देत असतात.

नियमित केलेल्या साधनेमुळे सबुरीचे महत्त्व समजते. आततायीपणे कुठलेही नेक कृत्य हातून घडत नाही. आलेले संकट काही काळ गेल्यावर ओसरणार आहे व त्यातून निघणारा मार्ग ईश्वराच्या इच्छेनेच होणार आहे, हा विश्वासच भक्तास फार मोठी शक्ती देतो. अशाप्रकारे श्रद्धा व सबुरी या दोन्ही पाठिराख्याप्रमाणे संकटात खंबीरपणे उभ्या राहतात.

संकटामध्ये परमेश्वराचे स्मरण अधिक उत्कटपणे होते. परमेश्वरावरील विश्वासामुळे आपण निर्भय असतो. विशेषतः, जेव्हा खोटे आरोप ठेवून एखाद्याचे हितशत्रू त्याच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न करतात तेव्हा

ती व्यक्ती व्यसनाकडे वळण्याची शक्यता जास्त असते. अशावेळी फक्त एक परमेश्वरावरील विश्वासच भक्तास तारून नेतो.

जीवनात असे अनुभव प्रत्येकास थोड्याफार फरकाने येतच असतात. अशाप्रसंगी परमेश्वर व संकटे यांचा परस्पर संबंध जोडून खरा भक्त भक्ती सोडत नाही; तर आलेल्या संकटांमुळे त्याची भक्ती अधिक दृढ होते.

संकटे मुळी येऊच नयेत यासाठी कुठे उपाय नाही. सारी संकटेच नष्ट करायची असतील, तर स्वतःसच संपवावे लागेल. तेव्हाच संकटांची मालिका बंद होईल. आलेल्या संकटांना धीराने कसे सामोरे जावे, हे नियमित साधना आपणास शिकविते.

याच्याही पुढे गेल्यास संकटे व साधना दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर आपल्यावर हुकूमत गाजवतात. देहबुद्धीत आलेल्या संकटांना सामोरे जाताना यश वा अपयश यांची तमा खरा भक्त बाळगत नाही. योग्य तऱ्हेने प्रयत्न करूनही जर एखाद्या कठीण प्रसंगातून बाहेर पडता येत नसेल तर त्याचे दूषण तो परमेश्वरास देत नाही. या ठिकाणी भक्ताच्या खरेपणाची मात्र कसोटी असते. हे दिव्य जो ओलांडून जातो त्याच्या साधनेत "मी साधना करतो" याऐवजी "माझ्याकडून माझा सद्गुरु साधना करवून घेतो", ही मधुर अवस्था आलेली असते. त्याचमुळे, खरा भक्त संकटातून सोडविण्यासाठी परमेश्वरास गळ घालीत नाही; फक्त सद्गुरुचे अखंड स्मरण व्हावे, एवढीच एक तीव्र इच्छा त्याची असते. आलेली संकटे त्याच्या दृष्टीने मोठी पर्वणी असते; कारण त्यातून अधिक उत्कटपणे परमेश्वराचे चिंतन होणार असते.

समर्थांनी तर दासबोधामध्ये खऱ्या भक्ताच्या लक्षणांमध्ये सांगितले आहे की, शरीराच्या भयंकर हालअपेष्टांमध्येही ज्याची परमेश्वरावरील श्रद्धा अढळ राहते तो खरा भक्त! साधनमार्गातील ही परीक्षा श्रद्धा व सबुरीच्या बळावरच पास होता येते. यासाठी सर्वप्रथम असा निर्धार केला पाहिजे की, आपला सद्गुरु सोडून दुसरीकडे बघायचे नाही.

बऱ्याच वेळा कठीण प्रसंगामध्ये आपला सद्गुरु सोडून दुसरीकडे धाव घेतली जाते. सारे सद्गुरु एकच परमात्मस्वरूप असतात. त्यांच्यामध्ये कमीजास्तपणा नसतो. पण, जो भक्त धरसोड करतो त्याच्या मनाची दोलायमान स्थिती साधनेसाठी हानिकारक असते. साईबाबांनी तर यासाठीच "अपना तकिया छोड़ना नहीं," असे सांगून ठेवले आहे.

❑❑❑


(पृष्ठ क्र. ४१ वरून)

अडचणींमुळे म्हणा, आपल्याला वारंवार पूजा करणे किंवा देवळात जाणे जमत नसते. अध्यात्मशास्त्रात यावरही उपाय आहे आणि तो म्हणजे मानसपूजेचा ! अध्यात्मशास्त्रात एक तत्त्व आहे, स्थूलातून सूक्ष्मात जाणे. येथे स्थूल म्हणजे, जे डोळ्यांनी दिसू शकते किंवा जे दृश्य स्वरूपात आहे ते. तर, सूक्ष्म म्हणजे, अतिशय लहान, डोळ्यांनी न दिसणारे. ईश्वर हा 'सूक्ष्म' आहे. तो आपल्याला डोळ्यांनी दिसत नाही; म्हणून त्याच्या मूर्तीची आपण पूजा करतो; ही झाली 'स्थूलातून पूजा'. 'मानसपूजा' ही मनाने करावयाची पूजा असल्याने, म्हणजेच सूक्ष्मातून करावयाची पूजा असल्याने, या पूजेमध्ये तसे नसते. ही पूजा आपण कुठेही व कधीही करू शकतो. तिला स्थळ-काळाचे बंधन नसते. देवाला मनाने नमस्कार करणे, मनाने जप करणे, अशी मानसपूजेची उदाहरणे देता येतील. परमेश्वर आपल्याला दिसत नसला तरी, त्याचे अस्तित्व आपल्याला सदैव जाणवत असते आणि या सूक्ष्म अशा परमेश्वराशी आपण मानसपूजेच्या माध्यमातून एकरूप व्हायचा प्रयत्न करायचा आहे. त्याद्वारेच आपण सदैव परमेश्वराच्या सान्निध्यात राहून आनंदी राहू शकतो. शिवाय, असे केल्याने अनेक व्यावहारिक फायदेही होतात; मन एकाग्र होण्यास मदत होते, योग्य निर्णय तत्काळ घेता येतात वगैरे. 'अध्यात्म' हे कृतीचे शास्त्र आहे. येथे कृती करण्याला ९८ टक्के महत्त्व आहे. म्हणून, शास्त्राप्रमाणे कृती केल्यास त्याची अनुभूती जलद येईल.

कलियुगातील आपली आयुर्मर्यादा फारच कमी आहे. या थोड्या कालावधीत जास्तीतजास्त आध्यात्मिक उन्नती करून घ्यायला हवी. त्याकरिता योग्य साधना करणे आवश्यक आहे.

(सौजन्य : पितांबरी)

❑❑❑



## अभिप्राय

दसरा-दिवाळी विशेषांक आवडला. अल्प मूल्यात 'अमूल्य' आपण देत आहात. अंकाचे बाह्यांग विलोभनीय असतेच; त्याचबरोबर अंतरंगातील प्रसिद्ध लेखकां-बरोबरच नवोदित लेखक-कवींचे विचार माहितीपूर्ण, उद्बोधक व अंतर्मुख करणारे असतात. सर्व साईभक्त श्री. सुकथनकर साहेबांना धन्यवाद व दुवा जरूर देतील. अशीच आपणा सर्वांकडून श्री साईसेवा घडो, ही साईबाबांजवळ प्रार्थना.

**- वसंत दळवी**, ठाणे.

❑❑❑

अगत्यपूर्वक पाठविलेला दसरा-दिवाळी विशेषांक मिळाला. या अंकातील अभ्यासकांनी लिहिलेले लेख विशेष आवडले. डॉ. हे. वि. इनामदार, बाबा महाराज सातारकर, तसेच इतरांचे लेखन भावले. 'प्रसाद ग्रहण' या विषयावरील चिंतनात्मक लेख विशेष भावले. व्यवस्थापन मंडळाचा वार्षिक अहवाल वाचला. संस्थेच्या प्रगतीची माहिती मिळाली. यासंदर्भात एक सूचना आहे. शिरडी येथे बसस्थानकापासून जवळच पूर्वी संस्थानतर्फे सामान ठेवण्याची सोय होती. मात्र आता ही सेवा नाही. ती सेवा देण्यात आल्यास तिथेच सामान ठेवून दर्शन घेऊन परत जाणाऱ्यांना सोयीचे होईल. कृपया ही सेवा देण्यात यावी.

**- प्रा. अरुण पाथडकर**
पंडे यांचा वाडा,
मु. पो. ता. कुही, जि. नागपूर.

❑❑❑

'साईलीला'चा दसरा-दिवाळी अन् नोव्हें.-डिसें., २००१ असे दोन्ही अंक नुकतेच पावले. दोन्हीही अंक देखणे, लक्षणीय आहेतच; शिवाय विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण लेखांच्या अंतर्भावानं ते संग्रहणीय आहेत. अभिनंदन. 'दत्तजयंती'च्या निमित्ताने श्री दत्तसांप्रदायिक गुरुपरंपरेतील महान दत्तोपासक संत जनार्दनस्वामींची परिचयभेट 'साईलीला'तून घडविल्याबद्दल धन्यवाद.

**- डॉ. सौ. कुमुद गोसावी**
स्नेहकुंज, ११ सरस्वती कॉलनी (पूर्व),
औरंगाबाद.

❑❑❑

'साईलीला'चा नोव्हेंबर-डिसेंबर २००१ चा अंक मिळाला. अंक वाचून मनाला समाधान वाटले. विशेषतः 'त्रैमूर्ति - अवतार कथनं' हा गुरुचरित्रातील अध्याय फारच आवडला. 'साईलीला'ची अशीच प्रगती होत राहो, ही साईचरणी नम्र प्रार्थना.

**- एस. जे. गडेकर**
गोवा.

❑❑❑

दसरा-दिवाळी विशेषांक आणि नोव्हेंबर-डिसेंबर, २००१ हे दोन्ही अंक मिळाले. दोन्ही अंक खूपच आकर्षक असून त्यांतील लेख फारच उद्बोधक असून दोन्ही अंक संग्राह्य आहेत. 'सकलांचा त्राता श्री साईदाता' हा लेख अत्यंत मार्मिक असून त्यातील साईबाबांचे बोल लक्षात ठेवण्यासारखे आहेत. दोन्ही अंकांची मुखपृष्ठे विलोभनीय असून बुद्धीला चालना देणारी आहेत. 'साईलीला'द्वारे साईभक्तांना असेच ज्ञानगंगामृत मिळत राहो, ही श्री साईबाबांच्या चरणी नम्र प्रार्थना.

**- भिकाजी एस. धनवलकर**
चिंचोली, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.

❑❑❑

सर्वप्रथम नवीन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा. 'साईलीला'चा नोव्हेंबर-डिसेंबरचा अंक मिळाला. मनःपूर्वक धन्यवाद. प्रसन्न मुखपृष्ठ पाहताक्षणीच लक्ष वेधून घेते. संपादकीय वाचकांशी सुसंवाद साधणारे आहे. डॉ. सौ. कुमुद गोसावी यांनी दत्तोपासक स्वामी जनार्दन यांचा करून दिलेला परिचय साक्षेपी आहे. त्यांनी एकनाथांना निर्विकल्प समाधी-अवस्थेत राहू न देता तीर्थयात्रेच्या निमित्ताने त्यावेळच्या समाजाचे दर्शन घडवले, हे त्यांचे निवेदन श्रीरामकृष्ण - विवेकानंद या गुरुशिष्याच्या जोडीची आठवण करून देणारे आहे. दत्तावतारी श्री माणिकप्रभूंच्या

लेखात पुष्कळच नवीन माहिती मिळते. सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पहाण्याची ओळख करून देणारा प्रा. पाथ्रडकर यांचा लेख आवडला. संतांच्या सामाजिक कार्याचा परिचय करून देणारा 'संत तुकोबारायाचे समाजचिंतन' हा डॉ. इनामदारांचा लेख स्मरणीय आहे.

**- सौ. मुक्ता केणेकर**
५, वैखरी सहनिवास, १३-अ,
हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

❑❑❑

'साईलीला' - दसरा-दिवाळी व नोव्हेंबर-डिसेंबर, २००१ हे दोन्ही अंक पोहोचले. मुखपृष्ठे अत्यंत मोहक आणि आकर्षक आहेत. आतील सचित्र मजकूर व मांडणी खूपच उत्कृष्ट आहे. कार्यकुशल व अनुभवसंपन्न श्री. सुकथनकरसाहेब संपादन व व्यवस्थापन यशस्वीपणे पार पाडत आहेत. 'साईलीला'ची उत्तरोत्तर प्रगती होत राहो, ही श्री साईचरणी नम्र प्रार्थना.

**- बबनराव क्षीरसागर**
'श्रद्धा', ६५ सागरिका हौसिंग कॉलनी, तांबटकर मळा,
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर.

❑❑❑

दसरा-दिवाळीचा सर्वांगसुंदर अंक वाचला. आवडला, भावला. साईगुरुंच्या जीवनातील प्रसंग, आद्य संतकवयित्री महदंबा, आचार-प्रभाव धर्म, संतांची शिकवण, राष्ट्रसंत तुकडोजींची शिकवण, भारूडामधील परमार्थ तत्त्व, सकलांचा त्राता श्री साईबाबा, साई ॐ जप, संतांना देव बनवू नका, संत तुकारामांचे समाजचिंतन, भोजन नव्हे प्रसादग्रहण हे सर्वच लेख चिंतनीय, मननीय आहेत. सत्प्रवृत्त व्हायला प्रेरणा देणारे आहेत. पारमार्थिक विकास घडविणारे आहेत. सर्व लेखक-कवींचे अभिनंदन. 'साईलीला'चे कार्य चंद्राच्या कोरेप्रमाणे सतत वर्धिष्णु होत राहो, ही साईचरणी प्रार्थना.

**- विजय काळे**
डी. पशुपतीनाथ नगर,
गोदी रोड, दोहाड.

❑❑❑

दिनांक १२ ते १४ डिसेंबर, २००१ या कालावधीत मी सहकुटुंब शिरडीस गेलो होतो. श्री साईबाबा संस्थानने केलेला कायापालट खरोखरीच वैभवसंपन्न आहे! गेल्या तीन वर्षांपूर्वीची शिरडी आणि आताची शिरडी खूपच बदलली आहे. लेंडीबाग इतकी छान झाली आहे की, तिला उपमा देण्यास शब्दच नाहीत. तिचे रूप आता खूपच मनमोहक झाले आहे. तेथील कृत्रिम धबधबा अगदी नैसर्गिक वाटतो. समाधी मंदिर परिसराचे स्वरूप विलोभनीय झाले आहे. दर्शनरांगेमुळे आता व्यवस्थित दर्शन घेता येते. साईबाबा संस्थानचे अध्यक्ष द. म. सुकथनकर हे अध्यक्षपदी आल्यापासून श्री साईबाबा संस्थानचा विकास व्यवस्थित होत आहे. येथे राबविल्या जाणाऱ्या अनेक कार्यक्रमांना गती आली आहे. पुनर्विकास खूपच आनंददायी झाला आहे. धुनी, श्री साईबाबा बसत असत ती शिळा इत्यादी चिरंतन वस्तूंना संरक्षण जाळ्या लावल्याने त्या सुरक्षित झाल्या आहेत. समाधी मंदिराचा आवाका मोठा झाल्याने मोठ्या प्रमाणावर साईभक्त साईबाबांच्या अभ्यंग स्नानादि कार्यक्रमांचा आनंद लुटू शकतात. एकंदर, या नव्या मंदिराच्या रूपाकडे पाहिले की, आपोआपच साईकृपेने शब्द कागदावर उमटतात...

**पाहून साईरूप तुझे, झालो रे बेभान**
**वाटे आम्हाला व्हावे तुझ्या मंदिराचे श्वान**

संपादकपदी श्री. द. म. सुकथनकर व कार्यकारी संपादकपदी श्री. विद्याधर ताठे आल्यापासून 'साईलीला'चे स्वरूप मोहक व वाचनीय झाले आहे. वास्तविक, हे नियतकालिक पुन्हा मासिक स्वरूपात प्रकाशित व्हायला हवे. संस्थानमध्ये घडणाऱ्या घडामोडी दाखविण्याचा प्रयत्न अंकात केला जातो, ही स्तुत्य बाब आहे. यामुळे अंकात विविधता आली आहे. श्री साईबाबांची वेगवेगळ्या प्रकारची छायाचित्रे छापून साईभक्तांना अंक संग्रही ठेवण्यास उद्युक्त केले आहे. अंकात ग्रंथ परिचय व अन्य प्रासंगिक माहिती देण्याचा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

शिरडीत एक गोष्ट मात्र खटकली. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना शनीमंदिराच्या गेटकडून सोडून दोन-तीन हजार भाविक मावणारी जागा विनाकारण अडविण्यात आली आहे. याबाबत योग्य निर्णय घेऊन पूर्वीप्रमाणे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना सोडावे. आरोग्याच्या दृष्टीने व्यंग असलेल्या साईभक्तांना दिलासा मिळेल.

**- प्रशांत देवकर**
कल्याण (प.), ठाणे.

❑❑❑

मंत्री
उद्योग, व्यापार व वाणिज्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २१-१-२००२

श्री साईबाबा संस्थान श्रीक्षेत्र शिरडीच्या वतीने अनेक वर्षांपासून प्रकाशित होत असलेले 'साईलीला' द्वैमासिक मी आवडीने वाचत असतो. अलीकडे हिंदी-इंग्रजी भाषिक साईभक्तांसाठीही प्रकाशित होणारे द्वैमासिक माझ्या वाचनात आले.

संस्थानच्या वतीने शैक्षणिक, सौरऊर्जा प्रकल्प, आयुर्वेद उपचार केंद्र, शिरडी गावच्या पाणी पुरवठा योजनेस चांगला प्रतिसाद, जिल्ह्याच्या एक खिडकी योजनेस सहकार्य, भूकंपग्रस्तांसाठी मदत, आध्यात्मिक, धार्मिक व वैज्ञानिक असे अनेक उपक्रम राबविले गेले आहेत, ही बाब खरोखर स्तुत्य आहे.

'साईलीला' या द्वैमासिकामुळे समाजात सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक सद्भावना वाढीस लागेल, अशी आशा व्यक्त करून संस्थानच्या पुढील वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा चिंतितो.

(डॉ. पतंगराव कदम)

---

राज्यमंत्री
सामान्य प्रशासन, समाजकल्याण व
दारूबंदी प्रचार कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३१-१२-२००१

आपण अगत्याने पाठविलेला 'साईलीला दसरा-दिवाळी विशेषांक २००१' प्राप्त झाला. विशेषांकामध्ये दिलेले कार्याचे विवेचन हे खरोखर उत्तम आहे. यातूनच संस्थेच्या विश्वस्तांच्या कार्याचा, तसेच संस्थानच्या बहुविध कार्याची संपूर्ण माहिती मिळते. तसेच, सन १९२३ इतक्या दीर्घ कालावधीपासून साईभक्ती प्रचारार्थ प्रकाशित होत असलेल्या 'साईलीला' या द्वैमासिकातूनही साईभक्तांना बरीच माहिती मिळत असते.

अशा या दीर्घ कालावधीपासून प्रकाशित होणाऱ्या 'साईलीला' या द्वैमासिकास माझ्या हार्दिक शुभेच्छा !!!

आपला विश्वासू,

(डॉ. विजयकुमार गावीत)

---

राज्यमंत्री
ग्रामीण विकास
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २६-११-२००१

'साईलीला'चा दिवाळी विशेषांक मिळाला. सदर अंक माहितीपूर्ण असून भाविकांची अपेक्षा पूर्ण करणारा आहे. धन्यवाद !

आपला,

(बसवराज पाटील)

# साईभक्तांना आवाहन



**प्रिय साईभक्तांनो !**

सप्रेम नमस्कार,

आपण **'साईलीला'**चे वाचक आणि वर्गणीदार आहात. **'साईलीला'**चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. तशी पत्रे आम्हाला येत आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी **'साईलीला'** सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवी. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार **'साईलीला'**स मिळवून द्यायचे. त्यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी, खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. **श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !**

आपला स्नेहांकित,

**विद्याधर ताठे**

कार्यकारी संपादक, **'साईलीला'**

---

कार्यकारी संपादक,
**'साईलीला'**,
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई- ४०० ०१४.

**यांस,**

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी वार्षिक वर्गणी ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________

(ता. क. : सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)




**'साईलीला' परम पवित्र। त्यांतील सच्चरितकथासत्र।**

**वाचा हें निजगुरुचरित्र। इहपरत्र प्रबोधक॥**

- श्री साईसच्चरित



॥ ॐ गं गणपतये नमः ॥
॥ ॐ श्री साईनाथाय नमः ॥

बाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक
मार्च - एप्रिल, २००२ रु. ८/-

# साईलीला


…क : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताटे





तूं नरदेहधारी परमेश्वर । तूं ज्ञाननभींचा दिनकर ।।
तूं दयेचा सागर । भवरोगा औषधी तूं ।।

- श्री साईनाथ स्तवनमंजरी



# साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

स्थापना वर्ष १९२३

साईलीला

वर्ष ३ अंक १

मार्च–एप्रिल
२००२

इंटरनेट आवृत्ती
URL:http://www.shrisaibabasansthan.org

संपादक
**द. म. सुकथनकर**

कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

* कार्यालय *

'साईनिकेतन',
८०४–बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in


संगणकीय अक्षरजुळणी
संगणकीय विभाग, मुंबई
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

मुद्रण
चिराग प्रिंटर्स, मुंबई

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी
रु. १०००/- (टपालखर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



साई–राम

## अंतरंग


- संपादकीय : विद्याधर ताठे ३
- चला गाऊ साईरामायण ! : प्रा. डॉ. माधवराव दीक्षित ६
- मी पाहिलेले साईबाबा ! : गणेश चितांबर ८
- श्री साईंचे मूलभूत सिद्धांत : प्राचार्य सी. वाय. कुलकर्णी १४
- श्रीरामकथेचा देशविदेश संचार : विद्याधर ताठे २४
- चला जाऊ रामजन्माला : संजय परळकर २६
- ॥ श्री रामरक्षा स्तोत्रम् ॥ २७
- ॥ श्री साईनाथमहिम्न स्तोत्रम् ॥ २९
- ॥ साई उवाच ॥ : संग्राहक - प्र. का. सोमण ३०
- ॥ गुणियांचा गुणिया साईराजा ॥ : साईसेविका ३३
- साई-पत्रव्यवहार : साईसेविका ३५
- स्वामी नारायणाची कथा ४०
- स्वामी रामकृष्ण परमहंस ४१
- संत नरहरि सोनार ४२
- संत तुकारामांची वाणी □ संत एकनाथांची वाणी ४४
- अभिप्राय ४४
- ॐकार साधना कार्यशाळा ४६
- पुस्तकसूची ४७
- आवाहन ४८



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी


## विश्वस्त मंडळ


**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. शांताराम रं. मिराणे | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | ,, | श्री. प्रदीप र. पटेल | ,, |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | ,, | श्री. प्रकाश द. वागस्कर | ,, |
| श्री. भास्कर शं. बोरावके | ,, | श्री. दास ह. इनामदार | ,, |
| श्री. राजीव पुं. रोहोम | ,, | डॉ. अरुण दि. रासने | ,, |
| श्री. शामसुंदर ल. शहाणे | ,, | श्री. रमेश म. केंगे | ,, |
| श्री. चांगदेव ना. डुबे पाटील | ,, | डॉ. विलास द. पोतनीस | ,, |
| डॉ. अजेय चं. गर्जे | ,, | डॉ. तुकाराम चं. राठोड | ,, |
| श्री. कैलास गो. कोते पाटील | ,, | सौ. सुनीता वि. क्षीरसागर | ,, |
| श्री. देवराम बं. पवार | ,, | श्री. मधुकर सो. दंडवते | ,, |

**श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे** (कार्यकारी अधिकारी)

# संपादकीय





**चरितं रघुनाथस्य शतकोटीप्रविस्तरम् ।**
**एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ।।**

**श्री** रामरक्षा स्तोत्रात गायलेली प्रभू रामचंद्रांची ही महती अगदी लहानपणीच आपल्या कानावर पडलेली असते. घरामध्ये सकाळी पूजेनंतर वडिलधारी माणसे रामरक्षा स्तोत्र मोठ्याने म्हणत असत आणि सारे घर रामनामाच्या घनगंभीर ध्वनीलहरींनी कसे भारावून जात असे, याचा प्रत्यक्ष अनुभव आम्ही लहानपणी अनुभवलेला आहे. सायंकाळी दिवेलागण होताच तुळशीपुढे - देवापुढे दिवे - उदबत्ती लावली जाई आणि आमची आजी सर्व नातवंडांना जवळ घेऊन रामरक्षा, मारूती स्तोत्र म्हणण्यास शिकवीत असे. ही स्तोत्रे म्हटल्यावरच ती आम्हास छान छान गोष्टी सांगत असे आणि गोष्टीच्या ओढीने आम्ही सर्व नातवंडे अत्यंत उत्साहात रामरक्षा, मारूती स्तोत्र व इतर प्रार्थना आजीच्या पाठोपाठ म्हणत असू. एकेकाळी हे दृश्य सर्वच घरांमध्ये पहावयास मिळत होते. कारण एकत्र कुटुंब असे व त्यात नातवंडांचे गोकुळ नांदत असे. त्यामध्ये आजीचे स्थान व आजीचा मान मोठा असे. दूरदर्शनसारखी आकर्षणे नव्हती. त्यामुळे अंधार होताच सर्व मुले आजीभोवती आपोआप गोळा होत असत आणि आजीची संस्कार पाठशाळा अनौपचारिकपणे सुरू होत होती. आजीच्या अनौपचारिक संस्कार शाळेतच आम्हाला अनेक स्तोत्रे, अनेक संतांचे अभंग आणि रामायण-महाभारतातील संस्कार-कथांची धनसंपदा लाभली.

नव्या शहरी-फ्लॅट संस्कृतीने आपण आपली एकत्र कुटुंब-व्यवस्थाच नव्हे, तर आपली आजी व तिची अनौपचारिक संस्कार शाळाही हरवून बसलेलो आहोत. आपली भौतिक प्रगती - आर्थिक समृद्धी झाली, पण आपले सौख्य वाढले का ? हा प्रश्न आहे. दूरदर्शन, इंटरनेटने सर्व जग आपल्याजवळ आणले असले तरी आपण मूळ आपल्याच माणसापासून - नात्यागोत्याच्या भावबंधापासून दूर गेलेलो आहोत. पूर्वी एकत्र कुटुंब-पद्धतीमुळे

चुलतभाऊ, मामेभाऊ, मावसभाऊ हेसुद्धा आपल्याच कुटुंबातील वाटत होते. आज आपण 'आम्ही दोघे व आमचा एकुलता एक' एवढ्यापुरते सीमित झालेलो आहोत आणि गप्पा मात्र सारे विश्व जवळ आल्याच्या करतो आहोत.

आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती ही की, आजीची अनौपचारिक संस्कार पाठशाळा ही आपल्या प्राचीन शिक्षण-पद्धतीचाच एक दृढ धागा होती. वेद-उपनिषदे-शास्त्रे यांचे आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षे जतन केले ते मौखिक पाठांतराद्वारे ! आपल्या परंपरेत पाठांतराला स्थान होते. त्याला कालबाह्य ठरवून नव्या शिक्षण-व्यवस्थेतून हद्दपार करण्यात आले आहे. स्तुती - स्तोत्रे सोडाच, पण साधे पाढेही आजकालच्या मुलांचे पाठ नसतात. अगदी छोटे छोटे गुणाकारही त्यांना 'कॅल्क्युलेटर'शिवाय येत नाहीत. 'कॅल्क्युलेटर'मुळे मुलांचे परावलंबित्व वाढले आहे. कोणतीही नवी पद्धती स्वीकारण्यास हरकत नाही, पण त्यासाठी आपल्या जुन्या पद्धती पूर्णपणे टाकून देण्याचे कारण नाही. जुन्यातील चांगले व शाश्वत आपण आवर्जून जोपासले पाहिजे. प्राथमिक शिक्षणातील कविता, गीते, स्तोत्रे, अभंग - पाठांतराचे स्थान आपण जोपासले पाहिजे. प्रौढ वयात मनात आले तरी आपण पाठ करू शकत नाही आणि मग आता वेळ गेली म्हणून केवळ पश्चात्ताप वाटतो. काही गोष्टी या वेळच्या वेळीच कराव्या लागतात. कारण ती वेळ व काळ पुन्हा परतून येत नसतो.

**दिन गेले भजनावीन सारे ।**
**बालपणा रमण्यात गमविला ।**
**यौवनात धन लौकिक प्यारे ।**
**दिन गेले भजनावीन सारे ।।**

असे पश्चात्तापाचे क्षण, प्रत्येक गोष्ट वेळीच जाणीवपूर्वक लक्ष देऊन केली तर कशाला येतील ? अगदी बालवयातच अनेक कथा-गोष्टींतून जिजाबाईंनी शिवाजी राजांवर स्वराज्याचे संस्कार केले, म्हणूनच तरुण शिवबाने स्वराज्याचे तोरण बांधले आणि हिंदूपतपादशाहीची स्थापना केली. थोर, मोठ्या अनेक राष्ट्रपुरुषांची चरित्रे आपण पहा, त्यांची जडणघडण त्यांच्या बालपणीच्या संस्कारातच आढळते. संस्कार हेच आपल्या संस्कृतीचे अधिष्ठान आहे. **'जन्मनः जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते.'** सर्वांचा जन्म एकाच प्रकारे मातेच्या उदरातून होत असल्याने जन्माने सर्वजण शूद्रच असतात आणि संस्कार झाल्यावर त्याला ब्राह्मण म्हटले जाते. शूद्र - ब्राह्मण हे जाती - वर्ण वाचक नसून गुणवाचक शब्द आहेत. कोणीही सद्गुणी माणूस ब्राह्मणच असतो. रुढी-प्रथा-परंपरेच्या जाती-वर्णाच्या कल्पना साईबाबांनी आपल्या लीलांमधून अनेक वेळा त्याज्य मानल्याचे दिसून येते. संत ज्ञानदेवांनी तळागाळातील ईश्वरभक्तांना संतपदी आरूढ करून पारंपरिक जाती-वर्णापेक्षा, भक्तिप्रांतातील श्रेष्ठत्वाला मान दिला आहे. या ज्ञानदेवादि साधुसंतांच्या अभंग साहित्याचा अक्षय ठेवा आज आपणास लाभलेला आहे तो वारकऱ्यांच्या मौखिक पाठांतरामुळेच, हे विसरून चालणार नाही. 'ज्ञानदेव - तुकोबांची हजारो ओव्या-अभंग असलेली ज्ञानेश्वरी - गाथा, तोंडपाठ असणारे अनेक निरक्षर वारकरी महाराष्ट्राच्या खेडोपाडी आजही आपणास भेटतात. आळंदी ते पंढरपूर हजारो वारकरी पायी दिंडी घेऊन

जातात. ते पायी चालतानाच मुखाने अभंग म्हणत असतात. १५ दिवसांत ते हजारो अभंग म्हणतात. ते ग्रंथ पाहून नव्हे, तर ते त्यांचे सामूहिक पाठांतरच असते. संतांच्या अभंगांचा अमोल ठेवा मुद्रण काळापूर्वी वारकऱ्यांनी ज्या निष्ठेने जतन करून ठेवला त्याबद्दल वारकरी समाजाचे मानावे तेवढे सामाजिक ऋण थोडेच आहे. साईभक्त हेमाडपंतांनी साईसच्चरितामध्ये या संतांचे वंदन करून त्यांच्या सामाजिक ऋणाचाच निर्देश केलेला आहे, असे मला वाटते. साईभक्त हेमाडपंत आपल्या मंगलाचरणात म्हणतात :-

**आतां वंदूं संतसज्जनां । निवृत्ति-ज्ञानेश्वर-मुक्ता-सोपाना ।**
**एकनाथा स्वामी जनार्दना । तुकया कान्हा नरहरि ।।** (अ. १/३०)

**श्री** साईबाबांनी शिरडी येथे पूर्वी अनेक वर्षे सुरू असलेल्या गावजत्रेला (उरूस) रामजन्मोत्सवाचे रूप दिले आणि भक्तांपुढे प्रभू रामचंद्रांच्या दिव्य जीवनाचा आदर्श ठेवला. रामजन्माचे कीर्तन करण्यास त्यांनी भीष्म व काका महाजनी यांना संमती दिली, एवढेच नव्हे तर, त्यांना हार घालून आपला आशीर्वादही दिला. **'कथातात्पर्य आणि योजना । ऐकूनि मंना आनंदले ।।** (अ. ६/७९) ही बाबांची स्थिती सांगून हेमाडपंत पुढे वर्णन करतात :-


**बाबाही तैं प्रसन्नवदन ।**
**जैसें दिधलें अनुमोदन ।**
**तैसाचि उत्सव घेतला करवून ।**
**कीर्तनभजनसमवेत ।।** (अ. ६/८३)

रामनवमी उत्सवातील कीर्तन हे जनप्रबोधनाचे, भक्तिप्रचाराचे एक मुख्य साधन. आपल्याकडे कीर्तनाचीही फार प्राचीन परंपरा आहे. नारदमुनी कीर्तनकलेचे आद्य मानले जातात. नवविधा भक्तीमध्ये नामसंकीर्तनाला महत्त्वाचे स्थान आहे. 'साईलीला' नियतकालिक हे एक प्रकारचे शब्द-कीर्तनच आहे. विशेष म्हणजे हे अक्षररूपी - शब्दरूपी कीर्तनही १९२३ च्या रामनवमी उत्सवापासून (प्रकाशन) सुरू झालेले आहे. साईबाबांच्या भक्तिप्रचाराचे - जनप्रबोधनाचे कार्य 'साईलीला' गेली ७९ वर्षे करीत आहे. साईभक्तांचा या वाटचालीत फार मोठा सहभाग आहे. यापुढेही वाचकांचा असाच उदंड प्रतिसाद लाभो, ही प्रार्थना ! भक्तिप्रचाराची 'गुढी' आपण अशीच उंच फडकत ठेवावी, ही विनवणी !!

**भारतीय नव संवत्सराच्या (चित्रभानु शके १९२४) सानंद शुभेच्छा !**

**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक,
**साईलीला**

# चला गाऊ साईरामायण !



शिरडीक्षेत्री चला भक्तगण
तिथे गाऊ साईरामायण ॥ धृ० ॥

जन्मोजन्मीची पुण्याई
म्हणूनि शिरडी जाणे होई
तिथे द्वारिका मशीदमाई
असती दरबारी प्रभुसाई
निंबतरूतळी साई बैसे
सिंहासन करूनि पाषाण ॥ १ ॥

देहरूप जरी साई जाती
अवताराची कशी समाप्ती ?
असे चिरंतन साईविभूती
सदा तयाची येई प्रचिती
साक्षात् अनुभव साईकृपेचा
साईभक्तीने भरता कणकण ॥ २ ॥

दिसे गव्हाचे येथे पोते
कर्मबीज दळण्यासी जाते
साईप्रभुशी जडते नाते
साईकृपेची सत्ता कळते
संसारातील परमार्थाचे
साईभक्ती हे दैवी भूषण ॥ ३ ॥

शिरडीस्थानी पाऊल पडता
नको बहाणा नको अहंता
भोळी भक्ती साईप्रियता
साईकृपा अन् साईसत्ता
चित्तशुद्धीने यास मानता
संसारातील संपे वणवण ॥ ४ ॥

चरणरजा लाविता कपाळी
साई सर्वांना सांभाळी
साई करितो न्यारी खेळी
ओढी भक्ता आपुल्याजवळी
आपुल्या गोपी-गोपाळांना
घेऊन करितो क्रीडा कृष्ण ॥ ५ ॥

तन-मन-धन की कौन बड़ाई
पाठीमागे असता साई
होनी की अनहोनी होई
अनहोनी की होनी होई
संसारातील नश्वर सारे
साईचरणी करू समर्पण ॥ ६ ॥